दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
अहिल्यानगर। पुणे। छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिद्ध

संपादक : काकासाहेब नवले । RNI NO.MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रु. ४.००। अंक २८४। मंगळवार, दि.२८ जुलै २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Sahyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

## साईभक्तांच्या विश्वासाला प्रामाणिक सेवेची जोड!

### 'राष्ट्र सह्याद्री' वृत्ताच्या फ्रेमद्वारे कर्मचाऱ्यांचा गौरव



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** श्रद्धा आणि सबुरीची शिकवण देणाऱ्या श्री साईबाबांच्या शिर्डीत प्रामाणिकपणा आणि सेवाभावाचा आणखी एक प्रेरणादायी आदर्श समोर आला आहे. श्री साईबाबा संस्थानच्या संरक्षण विभागाने आजपर्यंत हरवलेल्या सुमारे ८५ लाखांहून अधिक किमतीच्या वस्तू मूळ मालकांना परत करून विश्वासार्ह सेवेचा उल्लेखनीय विक्रम प्रस्थापित केला आहे. या सेवाभावी कार्याची दखल घेत दै. 'राष्ट्र सह्याद्री' मध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्ताची आकर्षक फ्रेम तयार करून ती संबंधित कर्मचाऱ्यांच्या घरी जाऊन देण्याचा अभिनव उपक्रमही राबविण्यात येत आहे.




गुरुपौर्णिमा महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शिर्डीत भाविकांची मोठी गर्दी असतानाच आज सकाळी पारायण कक्षात पारायण करत असलेल्या अनुपमा निरंजन (रा. बेंगळुरू) यांना एक पर्स आढळून आली. पर्समध्ये १५,४१० रोख रक्कम आणि आधार कार्ड होते. कोणताही मोह न बाळगता त्यांनी ती पर्स तत्काळ श्री साईबाबा संस्थानच्या संरक्षण कार्यालयात जमा केली. (उर्वरीत पान ४ वर)

**राष्ट्र सह्याद्री झळकणार घराघरात!**
**'घराघरात सन्मान' अभिनव उपक्रम**

भक्तांचा हरवलेला मौल्यवान मुद्देमाल प्रामाणिकपणे शोधून सुरक्षितपणे परत करणाऱ्या श्री साईबाबा संस्थानच्या प्रामाणिक कर्मचारी व सुरक्षा रक्षकांचा सन्मान आता थेट त्यांच्या घरापर्यंत पोहोचणार आहे.यासाठी दै. 'राष्ट्र सह्याद्री' मध्ये प्रकाशित झालेल्या संबंधित वृत्ताची आकर्षक फ्रेम तयार करून ती कर्मचाऱ्यांच्या घरी जाऊन कुटुंबीयांना भेट देण्यात येत आहे. या उपक्रमामुळे प्रामाणिक कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव होत असून त्यांच्या कुटुंबीयांचा समाजात मान वाढत आहे. तसेच संस्थानातील इतर कर्मचारी व सुरक्षा रक्षकांनाही सचोटीने व प्रामाणिकपणे सेवा करण्याची प्रेरणा मिळत आहे.

## महत्वाचे...

### पतंजलीच्या पिठात कीटकनाशकाचे अंश

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** गव्हाच्या पिठाच्या एका बॅचमध्ये निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात कीटकनाशकाचे अवशेष आढळल्यानंतर न्यायालयाने संबंधित बॅच बाजारातून परत मागवण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयाचा परिणाम पतंजली फूड्सच्या प्रतिमेसह कंपनीच्या शेअरवरही झाला असून, रविवारी (२७ जुलै) शेअरमध्ये मोठी घसरण नोंदवली गेली.

केरळमधील कोट्टायम अन्न सुरक्षा प्राधिकरणाच्या तपासणीत संबंधित गव्हाच्या पिठाच्या बॅचमध्ये क्लोरपायरीफॉस या कीटकनाशकाचे प्रमाण कायदेशीर मर्यादेपेक्षा अधिक आढळले. त्यानंतर अन्न सुरक्षा विभागाने संबंधित बॅच बाजारातून परत मागवण्याचे आदेश दिले. कंपनीने २४ जुलै रोजी शेअर बाजाराला दिलेल्या माहितीत सांगितले की, केरळमधील अन्न सुरक्षा सहाय्यक आयुक्त कार्यालयाकडून रिकॉल आदेश प्राप्त झाला असून त्यानुसार संबंधित बॅच परत मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.कंपनीने स्पष्ट केले की, ही बाब केवळ गव्हाच्या पिठाच्या एका विशिष्ट बॅचपुरती मर्यादित असून इतर कोणत्याही उत्पादनावर त्याचा परिणाम झालेला नाही. क्लोरपायरीफॉस हे ऑर्गनोफॉस्फेट गटातील कीटकनाशक असून त्याचे जास्त प्रमाण शरीरात गेल्यास मज्जासंस्थेवर विपरीत परिणाम होऊ शकतो. चक्कर येणे, डोकेदुखी, मळमळ, पोटदुखी यांसारख्या तक्रारी उद्भवू शकतात. त्यामुळे अशा अन्नपदार्थांबाबत दक्षता घेण्याचे आवाहन तज्ज्ञांकडून करण्यात येते.दरम्यान, या घडामोडींचा परिणाम पतंजली फूड्सच्या शेअरवरही दिसून आला. कंपनीचा शेअर ५५२ या उच्चांकावरून घसरत सुमारे ३४४ पर्यंत आला. म्हणजेच सुमारे २०८.५५ किंवा ३७.७४ टक्क्यांची घसरण झाली. कंपनीचा ५२ आठवड्यांचा नीचांक ३२८.२० असून, सध्याचा शेअरभाव त्या पातळीच्या जवळ पोहोचला आहे.

### मुंढेंच्या धडक कारवाईनंतरही

# दूध संकलन वाढले!

## भेसळीविरोधी मोहिमेमुळे घटीच्या चर्चांना आकडेवारीचा छेद

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दूध व दुग्धजन्य पदार्थांतील भेसळीविरोधात राज्यभर कठोर कारवाई सुरू केल्यानंतर दूध संकलनात मोठी घट झाल्याची चर्चा रंगली होती. मात्र, दुग्ध व्यवसाय विभागाच्या अधिकृत आकडेवारीने या चर्चांना पूर्णविराम दिला आहे. उलट, राज्यातील दूध संकलनात यंदा लक्षणीय वाढ झाल्याचे स्पष्ट झाले आहे.गतवर्षीच्या तुलनेत मे महिन्यात दूध संकलनात ९.७६ लाख लिटरची वाढ होऊन ते १७९.२३ लाख लिटरवर, तर जून महिन्यात २.२५ लाख लिटरची वाढ होऊन १७१.७२ लाख लिटरवर पोहोचले आहे. विशेष म्हणजे २०२६ च्या जानेवारीपासूनच दूध संकलन सातत्याने वाढत असल्याचे विभागाच्या आकडेवारीतून दिसून येते.

दूध उत्पादनात वाढ होण्यामागे सिंचनाच्या वाढलेल्या सुविधा, चारा-पाण्याची मुबलक उपलब्धता, संकरीत गाई-म्हशींची वाढती पैदास आणि प्रक्रिया उद्योगांचा विस्तार ही प्रमुख कारणे असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे भेसळीविरोधातील कारवाईचा दूध संकलनावर कोणताही नकारात्मक परिणाम झालेला नसल्याचे स्पष्ट झाले आहे.दूध उत्पादक व प्रक्रिया व्यावसायिक कल्याणकारी संघाचे सचिव प्रकाश कुतवळ यांनी सांगितले की, दुधातील भेसळीचे प्रमाण मर्यादित असल्याने कारवाईचा संकलनावर परिणाम झाला नाही. खासगी, सहकारी डेअरी आणि दुग्ध व्यवसाय विभागातील समन्वयामुळे उत्पादन व संकलन दोन्ही वाढले आहेत.

**दूध संकलनाचा वाढता आलेख**
**आर्थिक वर्ष / प्रतिदिन सरासरी संकलन**
२०२१-२२ – १३१.५१ लाख लिटर
२०२२-२३ – १२४.९५ लाख लिटर
२०२३-२४ – १४९.१६ लाख लिटर
२०२४-२५ – १६९.७६ लाख लिटर
२०२५-२६ – १७१.१८ लाख लिटर



**राज्यातील प्रमुख दूध संकलन जिल्हे**
पुणे – सुमारे २४ लाख लिटर/दिवस
अहिल्यानगर – सुमारे २३ लाख लिटर/दिवस
कोल्हापूर – सुमारे १९ लाख लिटर/दिवस
सांगली – सुमारे १६ लाख लिटर/दिवस

**मे-जूनमध्ये झालेली दूध संकलनातील वाढ?**

| महिना | संकलन | वाढ |
|---|---|---|
| मे – २०२६ | १७९.२३ लाख लिटर | +९.७६ लाख लिटर |
| जून – २०२६ | १७१.७२ लाख लिटर | +२.२५ लाख लिटर |

# मुलीचा प्रेमविवाह, संतापाच्या भरात आईची चालत्या कारच्या बोनेटवर उडी




प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** शहरात सोमवारी (दि. २७) जुलै रोजी भरदुपारी १२ वाजेच्या सुमारास एका फिल्मी स्टाईल घटनेने मोठी सनसनाटी उडाली. मुलीने पळून जाऊन केलेल्या विवाहामुळे संतप्त झालेल्या ' आईने ' थेट चालत्या, स्विफ्ट कारच्या बोनेटवर बसून कार अडवण्याचा प्रयत्न केल्याचा थरार पाहायला मिळाला. कोर्टापासून ते छत्रपती शिवाजी चौकापर्यंत घडलेल्या या थरारनाट्याने शहरभर एकच खळबळ उडाली होती.सविस्तर माहिती अशी आहे की, सदरची तरूणी कारेगाव शिवार (ता. श्रीरामपूर) येथील रहिवाशी असून, तिचा प्रियकर पती (प्रियकर) हा केसापूर (ता. राहुरी) असून या तरुण-तरुणीने १५ दिवसांपूर्वीच घरच्यांच्या विरोधात जाऊन पळून लग्न केले होते. याप्रकरणी मुलीच्या आईने तालुका पोलीस ठाण्यात मुलगी हरवल्याची (मिसिंग) तक्रार दिली होती. हे दोघे पती -पत्नी कागदपत्रांच्या 'त्या' कामासाठी श्रीरामपूर कोर्टा परिसरात येणार असल्याची माहिती (उर्वरीत पान ४ वर)

**'आईची पुण्याई'**

विशेष म्हणजे ज्या स्विस्ट कार बोनेटवर 'त्या' मुलीची आई बसली होती, त्याच गाडीच्या मागील बाजूस काचेवर 'आईची पुण्याई' असे लिहिलेले होते.

**अन् व्हिडीओ व्हायरल**

सोशल मिडियावरून या घटनेचा व्हिडीओ प्रचंड व्हायरल झाल्यामुळे काही लोक शहराकडे धाव घेतली. विशेष म्हणजे दोन्हीकडे नातेवाईक पोलीस ठाण्यात गोळा झाले होते.

## जमिनीच्या वादाने हिरावला शेतकऱ्याचा जीव

### मृत्यूपूर्वी व्हिडिओ रेकॉर्ड करून दोघांवर गंभीर आरोप

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** जमिनीचा वाद, सततच्या धमक्या आणि मानसिक त्रास यामुळे एका कर्त्या शेतकऱ्याने जीवन संपवल्याची हृदयद्रावक घटना जामखेड तालुक्यातील दरडवाडी येथे घडली. विकास साहेबराव रणसिंग (वय ४०) यांनी आत्महत्येपूर्वी मोबाईलमध्ये रेकॉर्ड केलेल्या व्हिडिओत दोन व्यक्तींवर गंभीर आरोप केल्याने या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. त्यांच्या पत्नीच्या फिर्यादीवरून खर्डा पोलिसांनी दोघांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.



रविवारी सकाळी विकास रणसिंग यांनी राहत्या घरी गळफास घेतल्याचे त्यांच्या कुटुंबीयांच्या निदर्शनास आले. त्यांना तातडीने खर्डा येथील रुग्णालयात नेण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यानंतर पत्नी विद्या रणसिंग यांनी त्यांच्या मोबाईलची पाहणी केली असता आत्महत्येपूर्वी रेकॉर्ड केलेले काही व्हिडिओ आढळले.

या व्हिडिओत महादेव गोवर्धन दराडे हे आपली सहा गुंठे जमीन बळकावत असून ती परत देत नसल्याचा आरोप विकास रणसिंग यांनी केला आहे. तसेच काही महिन्यांपूर्वी त्यांच्यावर हल्ला झाल्याचाही उल्लेख केला आहे. दुसरीकडे शेजारील शेतकरी चतुर्भुज दाताळ यांच्याशी विजेच्या पोलच्या लाईनवरून सुरू असलेल्या वादामुळे सतत धमक्या मिळत असल्याने आपण मानसिकदृष्ट्या खचल्याचे त्यांनी व्हिडिओत म्हटले आहे.

घटनेनंतर संतप्त नातेवाईक आणि समाजबांधवांनी खर्डा पोलीस ठाण्यात गर्दी करत संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर यांनी हस्तक्षेप करून नातेवाईकांची समजूत काढली. त्यानंतर विद्या रणसिंग (उर्वरीत पान ४ वर)

## प्रवरा नदी पात्रात १३ हजार क्युसेकने पाण्याचा विसर्ग

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**आश्वी :** भंडारदरा आणि निळवंडे धरण क्षेत्रात सुरू असलेल्या धुवांधार पावसामुळे दोन्ही धरणे पूर्ण क्षमतेने भरण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून धरणांमधून प्रवरा पात्रात मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. उत्तर अहिल्यानगर जिल्ह्याची 'अमृतवाहिनी' मानली जाणारी प्रवरा नदी सध्या दुतर्फा काठोकाठ भरून वाहत असून, ओझर बंधाऱ्याच्या भिंतीवरून तब्बल १३ हजार क्युसेकने पाणी जायकवाडी धरणाच्या दिशेने वेगाने झेपावत आहे. यामुळे ओझर बुद्रुक आणि ओझर खुर्द (ता. संगमनेर) या दोन महत्त्वपूर्ण गावांना जोडणारा जुना पूल पूर्णपणे पाण्याखाली गेला आहे.



परिणामी या भागातील वाहतुक ठप्प झाली आहे.

अकोले आणि संगमनेर तालुक्यांच्या पाणलोट क्षेत्रात पावसाची संततधार कायम आहे. परिसरातील लहान-मोठी धरणे, बंधारे व तलाव पूर्ण भरले आहेत. त्यामुळे डोंगराळ भागातील ओढे व उपनद्या उधाणून थेट प्रवरा नदीला येऊन मिळत आहेत. यामुळे नदीच्या पाणीपातळीत प्रचंड वाढ झाली आहे. पाणीपातळी वाढल्याने प्रवरा नदीकाठा लगत असलेल्या शेतजमिनी आणि उभी पिके पाण्याखाली गेली आहेत. यामुळे बळीराजा चिंतेत सापडला असून, खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाकडून नदीकाठच्या सर्व गावांना सतर्कतेचा व सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे.ओझर बंधाऱ्याच्या भिंतीवरून ओसंडून वाहणारे (उर्वरीत पान ४ वर)

> **भंडारदरा धरणातून प्रवरा पात्रात १,९०४ क्युसेक, निळवंडे धरणातून ७,६०५ क्युसेक आणि आढळा नदीतून १,२९७ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. सध्या ओझर बंधाऱ्याच्या भिंतीवरून प्रवरा नदीपात्रात १३ हजार क्युसेक वेगाने पाणी वाहत आहे. तर, धरण क्षेत्रात पावसाचा जोर ओसरल्यास पाण्याचा विसर्ग टप्प्याटप्प्याने कमी केला जाईल.**
> **– योगेश घोगरे**
> उपविभागीय अधिकारी, प्रवरा डावा कालवा सिंचन व्यवस्थापन उपविभाग

# केंद्राकडून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना ३३५ कोटींची भेट : दत्तात्रय भरणे

## राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या दुसऱ्या हप्त्यासाठी पात्र ठरणारे महाराष्ट्र पहिले राज्य

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण तसेच ग्रामीण विकास मंत्री मा. शिवराजसिंह चौहान यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना अंतर्गत ३३५ कोटींच्या दुसऱ्या हप्त्याच्या निधीस मंजुरी दिली असून राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या दुसऱ्या हप्त्यासाठी पात्र ठरणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याची माहिती कृषीमंत्री मा. दत्तात्रय भरणे यांनी दिली.

शिवराजसिंह चौहान याच्यासोबत आयोजित ऑनलाईन आढावा बैठकीत कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासह केंद्रीय कृषी सचिव तसेच केंद्र व राज्य शासनातील वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते. बैठकीत राज्यातील विविध कृषी योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना अंतर्गत महाराष्ट्राने ७५ टक्क्यांहून अधिक निधीचा प्रभावी वापर केल्याबद्दल राज्याचे विशेष कौतुक केले. तसेच मिशन फॉर इंटिग्रेटेड डेव्हलपमेंट ऑफ हॉर्टिकल्चर योजनेत ८१.७३ टक्के निधी खर्च झाल्याने महाराष्ट्र देशातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या राज्यांमध्ये असल्याचे त्यांनी नमूद केले.

दत्तात्रय भरणे म्हणाले, राज्याच्या या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत केंद्र सरकारने ३३५ कोटींच्या निधीस मंजुरी दिली असून, यास राज्य शासनाचा ४०% पूरक हिस्सा २२३ कोटी मिळून एकूण ५५८ कोटींचा निधी राज्यातील कृषी विकासासाठी उपलब्ध झाला आहे. या निधीतून सूक्ष्म सिंचन, कृषी यांत्रिकीकरण, सेंद्रिय शेती, जमिनीचे आरोग्य व्यवस्थापन तसेच राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत विविध प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.या निधीमुळे कृषी विकास, पायाभूत सुविधा बळकटीकरण आणि शेतकरी कल्याणाच्या विविध योजनांना अधिक गती मिळणार आहे.

बैठकीदरम्यान डिजिटल कृषी क्षेत्रातील कामांचा विशेष आढावा घेण्यात आला. या क्षेत्रात निधी खर्चाचा वेग वाढवून आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत जलद पोहोचविण्याच्या सूचना केंद्रीय मंत्र्यांनी दिल्या. तसेच प्रलंबित निधीचा तातडीने वापर करून योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.यावेळी केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केंद्र सरकारचे उद्दिष्ट केवळ निधी वितरित करणे नसून प्रत्येक रुपया शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आणि कृषी विकासासाठी परिणामकारक पद्धतीने खर्च होणे हे असल्याचे स्पष्ट केले. योजनांचे सातत्याने निरीक्षण, वेळेत अंमलबजावणी आणि परिणामकारक खर्च यावर त्यांनी विशेष भर दिला. महाराष्ट्र शासन शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र शासनाच्या सहकार्याने कृषी क्षेत्र अधिक आधुनिक, तंत्रज्ञानाधारित आणि सक्षम करण्यासाठी कटिबद्ध असून, राज्यातील प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत शासनाच्या योजनांचा लाभ प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. असे मत यावेळी दत्तात्रय भरणे यांनी व्यक्त केले.

**मध्य प्रदेशच्या धर्तीवर नाशिक येथे सन २०२७ मध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी फळे व भाजीपाला उत्पादन वाढीस चालना देण्यासाठी तीन वर्षांसाठी राष्ट्रीय कृषी विकास योजना, एकात्मिक विकास कृषी अभियानांतर्गत ३७७ कोटींचा निधी उपलब्ध करून द्यावा. तसेच कृषी यांत्रिकीकरण योजनेसाठी अतिरिक्त ५०० कोटींची तरतूद मंजूर करण्यात यावी, अशी विनंती केंद्र शासनाकडे केली आहे. या माध्यमातून राज्यातील बागायती आणि आधुनिक शेतीला मोठी गती मिळेल.**
**दत्तात्रय भरणे,**
कृषिमंत्री, महाराष्ट्र राज्य



# पाण्याचा संघर्ष नव्हे, जलसमृद्धीचे राजकारण हवे !

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

गोदावरी खोऱ्यातील पाणीवाटपाचा प्रश्न हा महाराष्ट्रातील सर्वाधिक संवेदनशील विषयांपैकी एक बनला आहे. नाशिक, अहिल्यानगर आणि मराठवाडा या तीन प्रदेशांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून पाण्यावरून संघर्ष होत आहे. प्रत्येक पावसाळ्यात धरणे भरू लागली की, वरच्या भागातील शेतकऱ्यांच्या मनात एकच प्रश्न निर्माण होतो की, ''आपल्या धरणातील पाणी आपल्या शेतासाठी राहणार की जायकवाडीकडे जाणार?'' तर मराठवाड्यातील शेतकरी जायकवाडी धरणाच्या पाणीकडे आशेने पाहत असतात. या दोन्ही भावना रास्त आहेत. प्रश्न आहे तो शासनाच्या दीर्घकालीन जलनियोजनाचा.

यंदा मात्र परिस्थिती वेगळी आहे. जुलै महिन्यात सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर झालेल्या दमदार पावसामुळे नाशिक जिल्ह्यातील धरणांमधून तब्बल २६ टीएमसीहून अधिक पूरपाणी जायकवाडीकडे प्रवाहित झाले आहे. अहिल्यानगरमधील भंडारदरा आणि निळवंडे धरणांमधूनही मोठ्या प्रमाणात आवक झाली आहे. त्यामुळे जायकवाडी धरणाचा उपयुक्त जलसाठा ६५ टक्क्यांच्या दिशेने झपाट्याने वाढत आहे. परिणामी यंदा तरी समन्यायी पाणीवाटपाच्या तत्त्वानुसार वरच्या धरणांमधून सक्तीने पाणी सोडण्याची वेळ येणार नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे नाशिक आणि अहिल्यानगरमधील शेतकऱ्यांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे.

परंतु हा आनंद कायमचा आहे का? निश्चितच नाही. हा दिलासा केवळ भरपूर पावसामुळे मिळाला आहे. पाऊस कमी झाला की पुन्हा तोच संघर्ष उभा राहणार, हे वास्तव नाकारता येणार नाही. समन्यायी पाणीवाटपाचा कायदा मराठवाड्याच्या न्याय्य हक्कासाठी करण्यात आला. दुष्काळग्रस्त भागाला पाणी मिळालेच पाहिजे, याबाबत कोणाचेही दुमत असू शकत नाही. मात्र त्याची अंमलबजावणी अशी असावी की, उर्ध्व खोऱ्यातील शेतकऱ्यांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होऊ नये. आजही नाशिक आणि अहिल्यानगरमधील हजारो शेतकरी स्वतःच्या धरणाच्या जलसाठ्यापेक्षा जायकवाडीतील पाण्याची टक्केवारी मोजत असतात. ही परिस्थिती कोणत्याही प्रगत जलव्यवस्थापनाची ओळख ठरू शकत नाही.

महाराष्ट्रात पाण्याची कमतरता आहे, हे अर्धसत्य आहे. खरी समस्या म्हणजे उपलब्ध पाण्याचे असमान वितरण आणि अपुरे जलनियोजन. पश्चिम महाराष्ट्र आणि सह्याद्री भागात मोठ्या प्रमाणावर पाणी समुद्रात वाहून जाते, तर मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील काही भाग पाण्यासाठी झगडत राहतात. ही दरी भरून काढण्यासाठी केवळ धरणांतील पाणी एका भागातून दुसऱ्या भागात सोडणे हा कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाही. आता शासनाने धाडसी निर्णय घेण्याची वेळ आली आहे. नदीजोड प्रकल्प, पश्चिमेकडील अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्याकडे वळविणे, जलपुनर्भरण, नवीन साठवण क्षमता, कालव्यांचे आधुनिकीकरण आणि सूक्ष्म सिंचनाचा व्यापक विस्तार या विषयांवर युद्धपातळीवर काम झाले पाहिजे. प्रत्येक वर्षी पाण्याच्या राजकारणावर चर्चा करण्यापेक्षा पाण्याची उपलब्धता वाढविण्यावर भर दिला, तर संघर्ष आपोआप कमी होईल.

त्याचबरोबर समन्यायी पाणीवाटपाच्या प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता आवश्यक आहे. धरणांतील जलसाठा, विसर्ग, पर्जन्यमान आणि जलउपलब्धतेची माहिती रिअल-टाइम स्वरूपात सार्वजनिक झाली, तर संशय, आरोप आणि प्रादेशिक भावना कमी होतील. पाण्याचे निर्णय हे राजकीय दबावाखाली नव्हे, तर वैज्ञानिक निकषांवर आणि तज्ज्ञांच्या शिफारशींवर आधारित असले पाहिजेत.

यंदाचा भरघोस पाऊस महाराष्ट्रासाठी संधी घेऊन आला आहे. या संधीचा उपयोग केवळ धरणे भरण्यासाठी नव्हे, तर भविष्यातील जलसुरक्षेचा आराखडा तयार करण्यासाठी झाला पाहिजे. आज नाशिक, अहिल्यानगर आणि मराठवाडा आनंदी असतील; पण उद्याचा दुष्काळ पुन्हा त्यांना समोरासमोर उभे करू शकतो.

पाणी हा कोणत्याही एका प्रदेशाचा विषय नाही; तो संपूर्ण महाराष्ट्राच्या विकासाचा पाया आहे. त्यामुळे शासनाने आता ''पाणी वाटण्याच्या'' राजकारणातून बाहेर पडून ''पाणी वाढविण्याच्या'' धोरणाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. तेव्हाच समन्यायी पाणीवाटपाचा कायदा संघर्षाचे नव्हे, तर न्याय्य आणि शाश्वत विकासाचे प्रतीक ठरेल.

## प्रवरा मेडिकल ट्रस्टकडून १,२०० आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर :** प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या वतीने अकोले तालुक्यातील भंडारदरा व परिसरातील २१ प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील सुमारे १,२०० गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

प्रवरा मेडिकल ट्रस्टचे अध्यक्ष तथा प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील यांच्या संकल्पनेतून दरवर्षी आदिवासी भागात विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्याच उपक्रमाचा भाग म्हणून विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, स्कूल बॅग आणि अन्य आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत भंडारदरा, भंडारदरा कॉलनी, शेंडी, बारी बंगला, जहागीरदारवाडी, पेंडशेत, दरेचीवाडी, केलटेंभे, तीर्थाचीवाडी, कोल्हाटवाडी, साम्रद, लव्हाळवाडी, शिंगणवाडी, आदरवाडी, पांजरे, बांगरवाडी, शाळेचीवाडी, राजवाडा मुरशेत आदी गावांतील २१ शाळांमधील विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी स्कूल ऑफ पब्लिक हेल्थचे संचालक डॉ. सुनील अरसुडे, डॉ. राजेंद्र विखे पाटील यांचे स्वीय सहाय्यक अमोल सरगर, सुनील व्यवहारे, मनोज गाडेकर, रोहित तांबे आणि मंगेश सातपुते उपस्थित होते.

प्रवरा मेडिकल ट्रस्ट शिक्षणाबरोबरच आदिवासी बांधवांच्या आरोग्याचीही विशेष काळजी घेत आहे. राजूर आणि भंडारदरा येथे आदिवासी आरोग्य केंद्र, फिरता दवाखाना (मोबाईल क्लिनिक) तसेच दुर्गम भागातील रुग्णांसाठी मोटारसायकल ॲम्ब्युलन्स सेवा सुरू असून, या माध्यमातून आदिवासी भागातील नागरिकांना आरोग्य व शिक्षणाच्या सुविधा प्रभावीपणे उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

## उक्कलगाव न्यू इंग्लिश स्कूलची भव्य आषाढी वारी दिंडी उत्साहात



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**उक्कलगाव :** आषाढी एकादशीचे औचित्य साधत खासदार गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, उक्कलगावच्या विद्यार्थ्यांनी काढलेली भव्य पायी दिंडी आणि रिंगण सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला.

शाळेच्या प्रांगणातून टाळ-मृदंगाचा गजर आणि 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषात निघालेली ही दिंडी श्री हरिहर केशव मंदिराकडे मार्गस्थ झाली. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची बालदिंडीही यात सहभागी झाल्याने आनंदा द्विगुणीत झाला. दिंडी दरम्यान चिमुकल्यांचे झांज पथक, फुगडी आणि रिंगण सोहळा विशेष आकर्षण ठरले. यानिमित्ताने संपूर्ण गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले होते.

यावेळी विविध मान्यवरांसह ग्रामस्थांनी उपस्थित राहून बालवारकऱ्यांचे कौतुक केले. सांगतेवेळी सर्व विद्यार्थ्यांना लाडू व बिस्किटांचे वाटप करण्यात आले. प्राचार्य उत्तमराव गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सोहळा यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## वांबोरीत विठ्ठल भक्तांच्या भावना दुखावल्याचा आरोप ; आज धडक मोर्चा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** वांबोरी येथील विठ्ठल मंदिरातील घडामोडींमुळे विठ्ठल भक्तांच्या भावना दुखावल्याचा आरोप करत समस्त ग्रामस्थ, वारकरी व विठ्ठल भक्तांच्या वतीने मंगळवार, २८ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता वांबोरी पोलीस दुरक्षेत्र येथे निवेदन देण्यात येणार आहे. यापूर्वी सर्व विठ्ठल भक्त विठ्ठल मंदिरात एकत्र येणार असून, त्यानंतर पोलीस स्टेशनकडे जाऊन संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्याची मागणी करणार आहेत. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. या आंदोलनात मोठ्या संख्येने विठ्ठल भक्त, वारकरी व ग्रामस्थांनी सहभागी व्हावे, असे आवाहन समस्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. विठ्ठल मंदिराच्या प्रश्नावरून गावात निर्माण झालेल्या वादामुळे वातावरण चांगलेच तापले असून, मंगळवारी होणाऱ्या निवेदनाकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

## त्रिमूर्ती महाविद्यालयात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना अभिवादन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** नेवासा फाटा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारतरत्न, माजी राष्ट्रपती तथा प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पांजली अर्पण करण्यात आली. यावेळी त्यांच्या विज्ञान क्षेत्रातील योगदान, राष्ट्रपती म्हणून केलेले कार्य तसेच युवकांना दिलेल्या प्रेरणादायी संदेशांचा आढावा घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असा संदेश उपस्थितांनी दिला.

प्राचार्य डॉ. चांगदेव आरसुळे यांनी डॉ. कलाम यांच्या साधेपणा, प्रामाणिकपणा व राष्ट्रसेवेचा आदर्श विद्यार्थ्यांनी अंगीकारावा, असे आवाहन केले. उपप्राचार्या प्रा. निकिता बर्गे यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधन आणि नवोपक्रम जोपासण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यक्रमास डॉ. अनुराधा गोरे, प्रा. राव, प्रा. देवकर यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

## टाकळीभानमध्ये प्राईड अकॅडमीची भव्य वृक्षदिंडी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**टाकळीभान :** आषाढी एकादशीचे औचित्य साधत माऊली प्रतिष्ठान संचलित प्राईड अकॅडमीच्या वतीने टाकळीभान येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरापर्यंत भव्य वृक्षदिंडी काढण्यात आली. पालक, ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण गाव भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले. या दिंडीतून भक्ती, संस्कार आणि पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश देण्यात आला. माऊली प्रतिष्ठानचे संस्थापक ज्ञानेश्वर मुरकुटे यांच्या प्रेरणेतून व संस्थापिका डॉ. वंदनाताई मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. वारकरी, विठ्ठल-रुक्मिणी व पारंपरिक वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी टाळ-मृदंगाच्या गजरात दिंडीत सहभाग घेतला. ग्रामस्थांनी विविध ठिकाणी कमानी उभारून व पुष्पवृष्टी करत दिंडीचे स्वागत केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी संत गोरोबा काका यांच्यावरील नाट्यप्रयोग, विठ्ठल भक्तीवरील नृत्य आणि सांस्कृतिक सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली. डॉ. वंदनाताई मुरकुटे यांनी भारतीय संस्कृती, वारकरी परंपरा आणि पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

दिंडीचा समारोप श्री साईबाबा मंदिर परिसरात वृक्षारोपणाने झाला. यावेळी श्रीरामपूरचे नगराध्यक्ष करण ससाणे, सरपंच अर्चनाताई रणनवरे, उपसरपंच कान्हा खंडागळे, ग्रामस्थ, पालक आणि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## श्री क्षेत्र बहिरवाडीतील मोफत आमटी-भाकरी प्रसाद उपक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील श्री क्षेत्र बहिरवाडी येथील जागृत श्री कालभैरवनाथ देवस्थानमध्ये दर रविवारी राबविण्यात येणाऱ्या मोफत आमटी-भाकरी प्रसाद उपक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, अन्नदानासाठीही अनेक दाते पुढाकार घेत आहेत. या उपक्रमामुळे भक्तांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



श्री कालभैरवनाथ देवस्थान हे परिसरातील प्रमुख श्रद्धास्थान असून वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रम आणि उत्सव येथे भक्तिभावाने साजरे केले जातात. विशेषतः पौष महिन्यातील यात्रा उत्सवाला लाखो भाविक उपस्थित राहतात. गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या या अन्नदान उपक्रमाचे नियोजन विश्वस्त बाबासाहेब वाखुरे, सेवेकरी बाबासाहेब कोलते, दिगंबर घोरपडे, एकनाथ वाखुरे, किशोर जमधडे, किशोर हारदे, भाऊसाहेब नळघे, भाऊसाहेब नागरे यांच्यासह विश्वस्त मंडळाकडून केले जात आहे.

आषाढी ऽदशीच्या निमित्ताने रविवारी इंडिया युनायटेड इन्शुरन्स कंपनीचे विकास अधिकारी किशोर गारुळे, ॲड. भैय्या गारुळे, ॲड. भागवत शिरसाठ आणि ॲड. शिवाजी शिरसाठ यांच्या वतीने भाविकांना आमटी-भाकरीचे अन्नदान करण्यात आले. यावेळी श्री रामकृष्ण विवेकानंद आश्रमाचे प्रमुख बालब्रह्मचारी स्वामी ज्ञानेश्वरजी महाराज, मार्केट कमिटीचे सभापती नंदकुमार पाटील, ॲड. बाळासाहेब शिंदे, ॲड. नरेंद्र लोंढे, प्रगतशील शेतकरी संभाजीराव कारले यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांच्या प्रेरणेने आणि श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबांच्या कृपाशीर्वादाने या क्षेत्रातील पशुहत्येची प्रथा बंद करून अन्नदानाला प्राधान्य देण्यात आले आहे. भाविकांच्या आर्थिक योगदानातून प्रवरा नदीच्या मध्यभागी सुमारे सव्वा कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेले भव्य मंदिर या तीर्थक्षेत्राच्या वैभवात भर घालत असून, धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांमुळे बहिरवाडीचे महत्त्व अधिक वृद्धिंगत होत आहे.

## 'वारी स्वच्छतेची, वारी भक्तीची'' उपक्रमात यशवंत सामाजिक प्रतिष्ठानचा सहभाग

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** आषाढी एकादशी निमित्त लाखो वारकरी श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरमध्ये दाखल होतात. या भक्तिसागरानंतर पवित्र क्षेत्र स्वच्छ व निर्मळ ठेवण्याची सामाजिक जबाबदारी स्वीकारत यशवंत सामाजिक प्रतिष्ठान, सोनई (ता. नेवासा) येथील स्वयंसेवकांनी माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली ''वारी स्वच्छतेची, वारी भक्तीची'' या अभियानात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

विशेष म्हणजे, या स्वच्छता वारीचे यंदाचे सलग पाचवे वर्ष ठरले आहे. ''स्वच्छता हीच खरी सेवा आणि सेवेतच ईश्वराचे दर्शन'' या भावनेतून स्वयंसेवकांनी पंढरपूर परिसरात व्यापक स्वच्छता मोहीम राबवली. वारीनंतर निर्माण झालेला कचरा, निर्माल्य आणि इतर टाकाऊ वस्तू हटवून पवित्र भूमी स्वच्छ ठेवण्यासाठी स्वयंसेवकांनी मनापासून श्रमदान केले. या उपक्रमामुळे भाविकांसह स्थानिक नागरिकांनीही समाधान व्यक्त केले.



पंढरपूर येथे स्वच्छता वारी उपक्रमात सहभागी होऊन स्वच्छता करतांना यशवंत सामाजिक प्रतिष्ठान सोनईचे सदस्य.

यशवंत सामाजिक प्रतिष्ठान सामाजिक,शैक्षणिक आणि जनजागृतीपर उपक्रमांद्वारे सातत्याने समाजहिताचे कार्य करत आहे. या स्वच्छता अभियानातून केवळ परिसर स्वच्छ ठेवण्याचा संदेशच नव्हे, तर तरुणांमध्ये सेवाभाव, सामाजिक उत्तरदायित्व आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करण्यात आले.

या प्रसंगी पंढरपूरच्या नगराध्यक्षा डॉ प्रणिता भगीरथ भालके यांनी या उपक्रमाला आवर्जून भेट देऊन यशवंत सामाजिक प्रतिष्ठान सोनई मा मंत्री शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ, सुंदर आणि निर्मळ पंढरपूर घडविण्यासाठी यशवंतच्या स्वयंसेवकांनी दिलेले हे योगदान प्रेरणादायी असून, अशा उपक्रमांमधून सामाजिक सेवेला नवी दिशा मिळत असल्याची भावना व्यक्त केली.

**पंढरीच्या स्वच्छता मोहिमेत सहभागाचे भाग्य लाभते.**

वारी स्वच्छता उपक्रमात सहभागी होऊन पंढरपूरची स्वच्छता करण्याचे भाग्य यशवंत सामाजिक प्रतिष्ठानच्या सदस्यांना लाभते यांचा मनस्वी आनंद आहे प्रत्येक वर्षी तरुणांनीवारी स्वच्छता उपक्रमात सहभागी व्हावे व पंढरपूर स्वच्छ व सुंदर ठेवण्यास आपला हातभार लावावा उदयन गडाख उपाध्यक्ष यशवंत सामाजिक प्रतिष्ठान सोनई.

## पुणतांब्यात स्मार्ट मीटरवरून नागरिकांमध्ये संताप

### वाढीव वीजबिलांबाबत ऊर्जामंत्र्यांकडे तक्रार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा :** पुणतांबा गावात बसविण्यात आलेल्या स्मार्ट मीटरमुळे घरगुती ग्राहकांना वाढीव वीजबिले येत असल्याचा आरोप नागरिकांनी केला असून, याप्रकरणी ऊर्जामंत्र्यांकडे लेखी तक्रार करण्यात आली आहे. वाढीव बिलांमुळे सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक नियोजन कोलमडल्याचा दावा ग्राहकांनी केला आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गावातील ठराविक भागातच स्मार्ट मीटर बसविण्यात आले असून काही ठिकाणी घरातील सदस्य अनुपस्थित असतानाही मीटर बसविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. अनेक ग्राहकांना एका महिन्याचे दोन ते तीन हजार रुपयांपर्यंत वीजबिल आल्याने त्यांच्यावर आर्थिक ताण वाढला आहे. त्यामुळे स्मार्ट मीटर हटवून पूर्वीचे मीटर बसवावेत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

तक्रारीनंतरही वीज वितरण कंपनीकडून समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याची खंत ग्राहकांनी व्यक्त केली. ''बिल कमी होणार नाही, तुमचाच वापर जास्त झाला आहे,'' असे उत्तर संबंधित अधिकारी देत असल्याचा आरोप नागरिकांनी केला. तसेच काही कर्मचाऱ्यांकडून ग्राहकांशी उद्धटपणे वागणूक दिली जात असल्याचीही तक्रार करण्यात आली आहे.

स्मार्ट मीटरच्या प्रश्नावर तातडीने तोडगा काढावा, अन्यथा ग्रामस्थ स्वतः स्मार्ट मीटर काढून वीज वितरण कार्यालयात जमा करतील, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

**राजकीय नेत्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह**

स्मार्ट मीटरचा प्रश्न हा सर्वसामान्य नागरिकांच्या भावनेशी निगडित असून, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी आणि राजकीय कार्यकर्त्यांनी ठोस भूमिका घ्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. पुणतांबा हे चळवळींसाठी ओळखले जाणारे गाव असताना या प्रश्नावर लोकप्रतिनिधी मौन का बाळगत आहेत, असा सवालही नागरिकांनी उपस्थित केला आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल

### साई शांतिनिकेतन स्कूलचा दिंडी सोहळा उत्साहात

**कुकाणा** : नेवासा तालुक्यातीलअंतरातली येथील श्री साई शांतिनिकेतन स्कूल मध्ये आषाढी एकादशी निमित्त दिंडी सोहळयात टाळ मृदंगाचा गजर व विठ्ठल हरी नामाच्या जयघोषात विद्यार्थ्यांसह पालक व ग्रामस्थही झाले दंग. या दिडीं सोहळ्यास विद्यालया पासुन प्रारंभ करून पहिले रिंगन भक्तीमय वातावरणात संपन्न झाले.या दिडींचे सोहळ्याचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष अशोक कानडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी विठ्ठल – रुक्मीणी सह वारकरी आशा विविध वेशभूषा परिधान करून विठ्ठल – रुक्मिणीच्या पालखीची मिरवणुक काढली.या पालखीची सुंदर व आकर्षक सजावट करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी टाळ – मृदंगाच्या गजरात अभंग, भजन व हरिनामाचा जयघोष करत दिंडीत उत्स्फुर्त सहभाग घेतला. विठ्ठलराव कानडे यांच्या हस्ते आरती घेऊन दिंडी सोहळ्याची सांगता करण्यात आली या दिंडी सोहळ्यास ग्रामस्थ व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### एकादशीनिमित्त शिवांकुर विद्यालयाची बालदिंडी भक्तिमय वातावरणात



**राहुरी** : आषाढी एकादशीच्या निमित्ताने शिवांकुर विद्यालयाच्या वतीने देसवंडी येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात आयोजित करण्यात आलेली बालदिंडी भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा परिधान करून टाळ-मृदुंगाच्या गजरात विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत मुक्ताई यांच्या वेशात दिंडीत सहभाग घेतला. अभंग, भजन, गवळणी आणि वारकरी संप्रदायावरील नृत्य सादर करत विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. यावेळी सरपंच नितीन कल्हापुरे यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणीची पूजा करण्यात आली, तसेच मान्यवरांच्या उपस्थितीत वृक्षारोपणही करण्यात आले. शिवसेना जिल्हा संघटक रावसाहेब (नाना) खेवरे यांनी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केले. शिव प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने देसवंडी प्राथमिक आरोग्य उपकेंद्राला लहान मुलांसाठी डिजिटल वजनकाटा भेट देण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब पवार, सचिव डॉ. प्रकाश पवार यांच्या उपस्थितीत विश्वस्त मंगलताई पवार व डॉ. गौरी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. मुख्याध्यापक अरुण खिलारी, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### निमगाव शाळेच्या बालदिंडीतून वारकरी संस्काराचा जागर



**श्रीरामपूर** : तालुक्यातील निमगाव खैरी येथील जि.प.प्रा. शाळा निमगाव या शाळेने आषाढी एकादशी निमित्त भव्य बालदिंडीचे आयोजन केले होते.भारतीय संस्कृती,संत परंपरा,पर्यावरण संवर्धन,सामाजिक बांधिलकीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या उपक्रमाला विद्यार्थी,पालक, माता भगिनी व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सुरुवातीला पालखीतील विठ्ठल-रुक्मिणींच्या मूर्तींचे पूजन करण्यात आले.पारंपारिक वारकरी बालदिंडीने शुक्रवारी संपूर्ण परिसर विठ्ठलमय करून टाकला. विठ्ठल, रुक्मिणी, वारकरी, पारंपारिक वेशभूषेत सजलेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी हाती टाळ,भगवी पताका व हरिनामाच्या गजरात काढलेल्या दिंडीने उपस्थितांची मने जिंकली. बाल वारकऱ्यांचे गावातील ग्रामस्थांनी ठिकठिकाणी पूजन व औक्षण करून स्वागत केले. ज्ञानोबा,माऊली,तुकारामाच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांच्या भक्तिमय सादरीकरणाचे निमगाव खैरी ग्रामस्थांनी कौतुक केले. बालदिंडीत अंगणवाडीतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

### बेलपिंपळगाव ते मोहटादेवी दिंडीचे स्वागत

**टाकळीभान** : नेवासा तालुक्यातील बेलपिंपळगाव ते मोहटादेवी दिंडीचे मा. उपसरपंच बंडोपंत चौगुले व मित्र मंडळ यांच्या वतीने बेलपिंपळगाव फाटा येथे स्वागत केले. बंडोपंत चौगुले यांच्यावतीने दिंडीस बिस्कीट पुडे वाटप करून अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली. यावेळी दिंडीच्या वतीने बंडोपंत चौगुले यांचा सत्कार करण्यात आला. दिंडीस प्रा. कार्लस साठे सर यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी बेलपिंपळगावचे माजी उपसरपंच बंडोपंत चौगुले, शेतकरी संघटनेचे प्रभारी व प्रवक्ते प्रा.कार्लस साठे, ज्येष्ठ शेतकरी संघटना नेते हनुमंतराव वाकचौरे, मुमताज सय्यद, उद्योजक रेवणाथ कांगुणे, संदीप कोकणे, संदीप गटकळ, सुनील दारकुंडे, दिंडी चालक शिवाजी शिंदे, बाबासाहेब गायकवाड, बाळासाहेब गटकळ आदीसह भाविक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या कामांची डॉ. सुजय विखेंकडून पाहणी

**शिर्डी** : राहाता तालुक्यातीलसावळी विहीर खुर्द येथे उभारण्यात येत असलेल्या अत्याधुनिक पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारत बांधकामाची भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी संबंधित अधिकारी, ठेकेदारव सरपंच महेश जमधडे यांचे समवेत प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी डॉ. विखे यांनी महाविद्यालयाच्या इमारतीचा आराखडा, सुरू असलेल्या बांधकामाची गुणवत्ता, कामाची प्रगती तसेच उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक व पायाभूत सुविधांचा सविस्तर आढावा घेतला. पाहणी दरम्यान त्यांनी कामाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड होऊ नये, नियोजित वेळेत काम पूर्ण व्हावे आणि भविष्यात विद्यार्थ्यांना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होतील. या दृष्टीने अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. तसेच बांधकामातील काही त्रुटी निदर्शनास आणून देत त्या तातडीने दूर करण्याच्या सूचना संबंधिताना केल्या.

# कनगर बु. ग्रामपंचायतीत निधी अपहाराचा आरोप

## स्वतंत्र चौकशीची ग्रामस्थांची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव** : राहुरी तालुक्यातील कनगर बु. ग्रामपंचायतीत सन २०२१ ते २०२६ या कालावधीत शासकीय निधीचा मोठ्या प्रमाणात अपहार झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून, संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र यंत्रणेमार्फत सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात सरपंच, तत्कालीन व विद्यमान ग्रामसेवक यांनी संगनमत करून विविध शासकीय योजनांमधील निधीचा गैरवापर केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

बोगस बिले, बनावट अभिलेख, खोटे हजेरीपट तयार करणे तसेच





प्रत्यक्षात न झालेल्या कामांची नोंद करून निधीचा अपहार झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. घरपट्टी व पाणीपट्टी वसुलीतही अनियमितता झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. कराची रक्कम अधिकृत पावती न देता रोख स्वरूपात स्वीकारून ती ग्रामपंचायतीच्या खात्यात जमा न करता परस्पर विल्हेवाट लावण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. तसेच बिहार पॅटर्न अंतर्गत झालेल्या कामांमध्ये मजुरांच्या मजुरीबाबतही गंभीर त्रुटी असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याशिवाय, पाणीपुरवठा पाइपलाइन दुरुस्तीची बोगस बिले, इतर व्यक्तींच्या नावाने खर्च दाखविणे तसेच लेखापरीक्षण अहवालातील विसंगतींकडेही ग्रामस्थांनी लक्ष वेधले आहे. संबंधित कालावधीत पदावर नसलेल्या व्यक्तींची नावे अहवालात नमूद करण्यात आल्याने अहवालाच्या विश्वासार्हतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे.

या प्रकरणाची विशेष चौकशी समितीमार्फत तपासणी, आर्थिक लेखापरीक्षण, स्ट्रक्चरल ऑडिट तसेच २०२१ ते २०२६ या कालावधीतील सर्व अभिलेखांची पडताळणी करून आरोप सिद्ध झाल्यास संबंधित सरपंच, ग्रामसेवक व अन्य जबाबदार व्यक्तींवर दिवाणी व फौजदारी कारवाई करावी, तसेच शासनाच्या निधीची वसुली करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनावर भगवान शेटे, शिवाजी गाढे, ज्ञानेश्वर गाढे, रवींद्र गाढे, तुषार गाढे, आशिष कवाने यांच्यासह अनेक ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## उक्कलगावच्या विद्यार्थ्यांनी उंचावला नावलौकिक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**उक्कलगाव** : खा.गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्था, अशोकनगर संचलित, न्यू इंग्लिश स्कूल व रावसाहेब बाळाजी पाटील थोरात कला कनिष्ठ महाविद्यालय, उक्कलगांव येथील विद्यार्थ्यांनी इयत्ता ७ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहेत. विद्यालयातील एकूण चार विद्यार्थी या उच्चस्तरीय परीक्षेत यशस्वी झाले असून, त्यांनी विद्यालयाच्या परंपरेत अभिमानास्पद भर घातली आहे.

यशस्वी विद्यार्थी मध्ये कु. आदिती सतिश थोरात (१७४ गुण),कु. सायली दत्तात्रय मोरे (१४८ गुण),कु. रेणुका शिवाजी थोरात (१४४ गुण),चि. साईराम दत्तात्रय थोरात( १२४ गुण) मिळवून यशस्वी झाले.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे सचिव अविनाश आदिक, माजी नगराध्यक्षा अनुराधाताई आदिक, जेष्ठ नेते इंद्रनाथ थोरात, सहसचिव ड. जयंत चौधरी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील थोरात, तसेच सर्व गव्हर्निंग कौन्सिल सदस्य, पालक व ग्रामस्थ यांनी तीव्र शब्दांत आनंद व्यक्त केला. सर्व यशस्वी विद्यार्थी, विद्यालयाचे मुख्याध्यापक आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकवृंदाचे सर्वच स्तरातून अभिनंदन होत असून, त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

## सदगुरु नारायणगिरी महाराज आश्रम बालवारकऱ्यांच्या दिंडीचे नेवासानगरीत स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : आषाढी एकादशीनिमित्त सदगुरु आश्रमाचे संस्थापक समन्वयाचार्य ह.भ.प. महंत उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरेगाव रस्त्यावर व नेवासा बुद्रुक शिवारात असलेल्या सदगुरु नारायणगिरी महाराज आश्रमापासून ते नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरापर्यंत काढण्यात आलेल्या बाल वारकरी विद्यार्थ्यांच्या पायी दिंडीचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

संतसेवक हभप बाळासाहेब झिने सर यांनी या दिंडीचे नेतृत्व केले. सदरची दिंडीने नेवासा बुद्रुक येथील जागृत दक्षिणमुखी मारुती मंदिर, श्री विश्वेश्वर नाथबाबा मंदिर, म्हाळसा खंडोबा मंदिरात जाऊन दर्शन घेतले.



(छाया-सुधीर चव्हाण नेवासा)

यावेळी नाथबाबा मंदिरात विश्वस्त ज्ञाननाथ जायगुडे, सरपंच प्रकाश सोनटक्के यांनी दिंडीतील बाल वारकऱ्यांना केळी व फराळ प्रसाद देण्यात आला. तदनंतर पुरातन म्हाळसा खंडोबा मंदिरामध्ये जीर्णोद्धार समितीचे प्रमुख संभाजी ठाणगे व संगीता ठाणगे यांच्या हस्ते दिंडी प्रमुख बाळासाहेब झिने यांचा सन्मान करण्यात आला. बालवारकऱ्यांना बटाटा चिप्स व चहाचे वाटप करण्यात आले.

सदरची दिंडी नेवासा नगरीत आली असता दिंडीतील वारकऱ्यांनी ग्रामदैवत श्री मोहिनीराज मंदिर, जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज मंदिरात जाऊन दर्शन घेतले मंदिराचे विश्वस्त मंडळ व भाविकांच्या वतीने दिंडीतील वारकऱ्यांना फराळ प्रसाद देण्यात आला. नेवासा शहरातील चौकाचौकात दिंडीचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. सदरची दिंडी श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर प्रांगणात पोहचल्यानंतर बालवारकऱ्यांनी गोल रिंगण द्वारे ज्ञानोबा माऊली तुकारामचा जयघोष करत माऊली भक्तांना आकर्षित केले. सर्व बाल वारकऱ्यांनी पैस खांबासह मंदिरातील विठ्ठल रुख्मिणी, भगवान दत्तात्रय, संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, करविरेश्वर महादेव,संत ज्ञानेश्वर मंदिराचे उद्धारक वैकुंठवाशी हभप बन्सी महाराज तांबे यांच्या समाधीचे दर्शन घेऊन दिंडीचा समारोप करण्यात आला. दिंडीच्या वाटेने आश्रमातील बाल वारकऱ्यांनी भजनाचा मनमुराद आनंद लुटला.

# शासकीय जागेवरील अतिक्रमण प्रकरणी म्हैसगावच्या सरपंच अपात्र

## जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश; सरपंचपदासह सदस्यत्वही रद्द

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव** : राहुरी तालुक्यातील म्हैसगाव ग्रामपंचायतीच्या लोकनियुक्त सरपंच सुजाता अरुण पवार यांना शासकीय जागा व ओढ्याच्या पात्रावर अतिक्रमण करून बांधकाम केल्याच्या प्रकरणात मोठा धक्का बसला आहे.

अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम १४(१) (ज-३) व कलम १६ अन्वये आदेश देत त्यांचे सरपंचपद रद्द केले असून ग्रामपंचायत सदस्यपदासाठीही त्यांना अपात्र घोषित केले आहे. या प्रकरणी म्हैसगाव येथील प्रशांत सिताराम दुधाट, अशोक दामोधर कर्डे आणि विलास भागवत गागरे यांनी जिल्हाधिकारी न्यायालयात वाद अर्ज क्रमांक १७/२०२५ दाखल केला होता. गट क्रमांक ३७१ मधील शासकीय जागा तसेच ओढ्याच्या पात्रावर अतिक्रमण करून बांधकाम करण्यात आल्याचा आरोप अर्जात करण्यात आला होता.



अर्जदारांच्या वतीने ड. करण मुसमाडे व ड. वैष्णवी मुसमाडे यांनी विविध शासकीय अभिलेख, भूमी अभिलेख विभागाच्या मोजणीचे नकाशे, तहसीलदारांचा अहवाल आणि अन्य कागदपत्रे न्यायालयात सादर केली. भूमी अभिलेख विभागाच्या अधिकृत मोजणीत शासकीय जागेवरील अतिक्रमणाची नोंद आढळल्याचे समोर आले. तसेच ग्रामपंचायतीच्या काही अभिलेखांमध्ये नियमबाह्य फेरफार झाल्याचाही मुद्दा उपस्थित करण्यात आला. उपलब्ध पुरावे, महसूल विभागाचे अहवाल आणि दोन्ही बाजूंचा युक्तिवाद विचारात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी अतिक्रमण सिद्ध झाल्याचा निष्कर्ष नोंदवत सरपंचपदासह सदस्यत्वही रद्द करण्याचा आदेश दिला.

या निर्णयामुळे ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी शासकीय जागा व सार्वजनिक मालमत्तेबाबत कायद्याचे काटेकोर पालन करणे आवश्यक असल्याचा स्पष्ट संदेश गेल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. निर्णयानंतर म्हैसगाव ग्रामपंचायतीतील पुढील प्रशासकीय प्रक्रिया आणि नवीन सरपंच निवडीबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

## सचिन बडदे यांचा शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेनेत जाहीर प्रवेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर** : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते सचिन बडदे यांनी काँग्रेससोबतची युती आणि वैचारिक मतभेदांमुळे पक्षाला रामराम करत रविवारी ठाण्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. या पक्षप्रवेश सोहळ्यात त्यांच्यासोबत शहर सचिव राहुल रणधीर, तालुकाप्रमुख राधाकिसन बोरकर, महिला आघाडी जिल्हा संघटक शारदाताई कदम, वाहतूक सेना शहर संघटक यासीन सय्यद यांच्यासह शेकडो पदाधिकारी आणि हजारो शिवसैनिकांनी शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी शिर्डी लोकसभेचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार सचिन आहेर, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, शिवसेना नेते रावसाहेब खेवरे नाना, जिल्हाप्रमुख नितीन औताडे व कमलाकर कोते यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या मोठ्या राजकीय घडामोडीमुळे या भागात उद्धव ठाकरे पक्षाला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहेत.

प्रोसेस जमा रूपये
प्रोसेस पान नं.
दिनांक २७/७/२०२६

अ‍ॅड. मनेश काकाणी
राहुरी कोर्ट

### जाहीर नोटीस

राहुरी येथिल मे. सिव्हील जज्ज साहेब ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

रे.मु.नं. १८३/२०२२

कोर्ट नं. ३ — वादी
३. रे. सह दिवाणी न्यायाधीश — १. .. बँक ऑफ बडोदा
प्रतिवादी — १... आयशा आयुब इनामदार.

याकामी वादी तर्फे विनंती अर्ज खालील प्रमाणे –

१...... ज्याअर्थी वादी यांनी राहुरी न्यायालयामध्ये वाटपाचा दावा दाखल केला आहे ज्यामध्ये खालील इसम प्रतिवादी यांना समन्स बजावणी होत नाही नविन पत्ता माहित नाही तरी खालील प्रतिवादी यांना जाहीर समन्स प्रसिदधी देणेत येत आहे

प्रतिवादी नं. १... आयशा आयुब इनामदार, वय ३५ धंदा गृहिणी, रा. लाख ता. राहुरी जि. अनगर

तरी दाव्याची पुढील ता. २९/८/२०२६ अशी असुन आपणास या जाहीर नोटीसने कळविणेत येत आहे की या दाव्याचे कामकाज पहाणे करीता तुम्ही स्वतः अगर तुमचे प्रतिनीधी मार्फत मा. कोर्टात हजर रहावे व म्हणणे दाखल करावे अन्यथा तुमचे गैरहजेरी व तुम्हाला या दाव्याचे बाबत काहीएक म्हणणे दयावयाचे नाही असे समजुन दाव्याचे पुढील कामकाज चालवुन उपलब्ध पुराव्यावरून या दाव्याचा अंतिम निर्णय देणेत येईल

तारीख २७ जुलै २०२६ रोजी आमचे सही शिक्क्यानिशी दिले असे

शिक्का

हुकूमावरून

**कामगिरी क्लार्क**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, राहुरी**

**न्यायालय अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर राहुरी**

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मी रंजना बहिरनाथ ठोंबरे वय ४७ वर्षे, धंदा गृहिणी रा. म्हळस पिंपळगाव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर पीन कोड ४१४६०३, या ठिकाणचा रहीवाशी असुन माझे पती बहिरनाथ धोंडीराम ठोंबरे हे दिनांक ०३/१०/२०१८ रोजी जि के स्थानिक क्षेत्र, ता. हवेली जि. पुणे येथे मयत झाले आहे. त्यांच्या नावे इंटरनॅशनल ट्रॅक्टर मॉडेल DI-20 GARDENTRAC तिचा रजिस्ट्रेशन नं, MH 17 BV 1610 असा आहे.

रंजना बहिरनाथ ठोंबरे यांचे बहिरनाथ धोंडीराम ठोंबरे या मयत आहेत. त्यांना दोन मुले असे एकुण दोन कायदेशीर वारस असुन सर्व सज्ञान आहेत. त्यांच्या दोन मुले म्हणजेच माझे मुले नामे विशाल धोंडीराम ठोंबरे व तुषार धोंडीराम ठोंबरे यांनी सदरचे वाहन माझ्या नावाने ट्रान्सफर करण्याकामी संमती पत्र दिनांक २३/०७/२०२६ रोजी मे. नोटरी पब्लिक, अहमदनगर यांच्या समोर लिहुन नोंदवुन दिलेले आहे. सदरचे वाहन माझ्या (रंजना बहिरनाथ ठोंबरे) नावे ट्रान्सफर करणे कामी माझ्या मुलांचे संमतीपत्र, अर्ज व मृत्युदाखले ईत्यादी सर्व कागदपत्रे आर टी ओ ऑफिस श्रीरामपुर या कार्यालयात मी दाखल केलेले आहेत.

मयत बहिरनाथ धोंडीराम ठोंबरे यांचे इंटरनॅशनल ट्रॅक्टर मॉडेल DI-20 GARDENTRAC तिचा रजिस्ट्रेशन नं, MH 17 BV 1610 त्यांचा वारस पत्नी रंजना बहिरनाथ ठोंबरे याच्या नावे ट्रान्सफर करण्याकामी कोणाचीही काही हरकत, अधिकार, हक्क वगैरे असल्यास संबंधीतांनी आपल्या हरकती, तक्रारी वगैरे लेखी स्वरुपात योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह आर टी ओ ऑफिस श्रीरामपुर अथवा रंजना बहिरनाथ ठोंबरे वय ४७ वर्षे, धंदा गृहिणी रा. म्हळस पिंपळगाव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर पीन कोड ४१४६०३, (७४९८८३०६४७) यांच्याकडे ही जाहीरात प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत संपर्क साधुन सदर कागदपत्र व हरकत प्रत्यक्ष सादर करावेत. सदर मुदतीत कोणाचीही लेखी हरकत अथवा लेखी तक्रार न आल्यास, त्यांनी सदरचा हरकत, अधिकार, हक्क वगैरे जाणीव पूर्वक सोडुन दिला आहे असे समजण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ही नोटीस प्रसिध्दीस दिली तारीख २५/०७/२०२६

**रंजना बहिरनाथ ठोंबरे**

### जाहीर प्रगटन

समस्त गावकरी रेहकुरी ता. कर्जत जि. अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की या कार्यालयात श्री/श्रीम तबाजी किसन गायकवाड रा. रेहकुरी ता कर्जत जि. अहिल्यानगर यांनी आई नामे श्री/श्रीम कै. वंचाबाई किसन गायकवाड या नावे जन्म / मृत्यू प्रमाणपत्र मीळणे बाबत मागणी केलेली आहे.

सदर व्यक्तीचा जन्म / मृत्यू ता. रेहकुरी ता. कर्जत जि. अहिल्यानगर या ठीकाणी दि ०४/०४/१९९९ रोजी झाला असुन प्रमाणपत्र मिळणेसंबंधीत दि १७/०२/२०२६ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे.

वरील व्यक्तीच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसाच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतिनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**रवि सतवन**
**तहसिलदार कर्जत**

# छ.शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## प्रशासनाने दबावाला बळी न पडता जनतेची कामे करावीत; डॉ. सुजय विखे पाटील

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा येथील आराध्या मंगल कार्यालयात रविवारी आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या शिबिरात विविध शासकीय योजनांच्या लाभांचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ. सुजय विखे पाटील यांनी प्रशासनाने कोणत्याही दबावाला बळी न पडता प्रामाणिकपणे जनतेची कामे करावीत, असे आवाहन केले.

अधिकारी वेळेत काम करत नसतील तर सत्ताधारी पक्षाचे आमदार असले तरी लोकहितासाठी प्रशासनाविरोधात आंदोलन करण्यास मागे-पुढे पाहू नये.



सत्ता आणि पदापेक्षा जनता मोठी असून जनतेच्या प्रश्नांसाठी संघर्ष करण्यास आपण स्वतःही सोबत राहू, असे त्यांनी स्पष्ट केले. नेवासा तालुका गुन्हेगारीमुक्त करण्यासाठी कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे सांगत महिलांवरील अत्याचार, बलात्कार, खून यांसारख्या गंभीर गुन्ह्यांतील आरोपींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी नमूद केले.

शासनाच्या योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात महसूल समाधान शिबिर अभियान महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे त्यांनी सांगितले. आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी सांगितले की, तालुक्यातील ११ मंडळांमध्ये आयोजित २२ शिबिरांमधून सुमारे ७,५०० नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला.

### शहर विकास आणि गुन्हेगारीवर नियंत्रण ठोस निर्णय घेऊ

नेवासा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी लवकरच विस्तृत बैठक घेण्यात येणार असून, अतिक्रमण नियमितीकरण, शहर विकास आणि गुन्हेगारीवर नियंत्रण यासाठी ठोस निर्णय घेतले जातील. अतिक्रमण आणि अवैध व्यवसायांमधून अनेकदा गुन्हेगारीला खतपाणी मिळते. त्यामुळे अशा प्रवृत्तींवर कठोर कारवाई करून नेवासा तालुका गुन्हेगारीमुक्त करण्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी एकत्रितपणे काम करतील, असा विश्वास डॉ. सुजय विखे यांनी व्यक्त केला.

डिजिटल सातबारा, वारस नोंद, फेरफार यांसह महसूल विभागाच्या विविध सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या. यासाठी १३ शासकीय विभागांचे स्टॉल उभारण्यात आले होते.

तालुक्यातील २,०३५ बचत गटांमध्ये २५,५०० महिला कार्यरत असून अधिकाधिक महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास प्रांताधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार डॉ. संजय बिरादार, गटविकास अधिकारी संजय लखवाल, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, विविध विभागांचे अधिकारी, महायुतीचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने लाभार्थी उपस्थित होते. डॉ. रेवणनाथ पवार यांनी सूत्रसंचालन केले, तर तहसीलदार डॉ. संजय बिरादार यांनी आभार मानले. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# शिर्डीत फुटपाथ विक्रेत्यांच्या प्रश्नावर डॉ. सुजय विखे यांची बैठक ग्रामस्थांना विश्वासात घेऊनच निर्णय घेणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**शिर्डी:** येथे मागील आठवड्यात झालेल्या एका महिलेच्या निर्घृण खुनाच्या पार्श्वभूमीवर आज माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी शिर्डीत एक महत्त्वाची बैठक घेतली. येथील फुटपाथ विक्रेत्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी विक्रेत्यांच्या एका शिष्टमंडळाने डॉ. विखे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या बैठकीत डॉ. विखे यांनी कायदा-सुव्यवस्था आणि गरिबांचे हित या दोन्ही बाजू सांभाळत सर्वसमावेशक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले.बैठकीत शिष्टमंडळाशी संवाद साधताना डॉ. सुजय विखे म्हणाले की, कोणत्याही परिस्थितीत गोरगरिबांवर अन्याय होणार नाही याची संपूर्ण काळजी घेतली जाईल. मी नेहमीच सर्वसामान्य लोकांबरोबर आहे आणि कोणालाही उद्ध्वस्त करण्याचा आमचा हेतू नाही. फुटपाथ विक्रेत्यांसाठी आपली नियमावली आधीच तयार झाली होती, मात्र स्थानिकांमध्ये हा खुनाचा गंभीर प्रकार घडल्याने सध्या त्यास स्थगिती देण्यात आली आहे. अशा दुर्दैवी घटना घडल्यानंतर समाजहिताचा विचार करावा लागतो आणि त्यानुसारच निर्णय घ्यावा लागतो.पुढे बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, वडिलांनी घेतलेल्या निर्णयाच्या विरुद्ध जाणे योग्य नाही. त्यामुळे या संवेदनशील विषयावर आधी वडिलांशी सविस्तर चर्चा केली जाईल. स्थानिक ग्रामस्थांना विचारात घेतल्याशिवाय कोणताही निर्णय घेणे पूर्णपणे अयोग्य ठरेल. म्हणूनच, आधी ग्रामस्थांशी चर्चा करून त्यांना विश्वासात घेतले जाईल. या संपूर्ण प्रक्रियेत सर्वांचा समन्वय करणे अत्यंत गरजेचे आहे. ग्रामस्थांशी चर्चा करून झाल्यानंतर एक नवी नियमावली बनवली जाईल आणि त्याला अनुसरूनच अंतिम निर्णय घेतला जाईल. सर्वांना विश्वासात घेऊन लवकरच सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन डॉ. विखे यांनी दिले.



## पान १ वरुन

### मुलीचा प्रेम विवाह, संतापाच्या भरात आईची चालत्या कारच्या बोनेटवर उडी

मुलीच्या नातेवाईकांना मिळाली. त्यानुसार, आईसह सर्व नातेवाईक आधीच कोर्ट परिसर आणि तालुका पोलीस ठाण्याबाहेर जमा झाले होते. दोघेही स्विफ्ट कारमधून जात असताना नातेवाईकांनी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला. मुलीच्या आईचा पारा चढल्याने तिने थेट चालत्या कारच्या बोनेटवर उडी मारली. ती बोनेटवर बसूनच कार थांबवण्याचा प्रयत्न करत होती, अन् हातातील चप्पलेने गाडीवर वार करत होती, हा प्रकार कोर्टाजवळून सुरू होऊन कर्मवीर चौकामार्गे छत्रपती शिवाजी चौकापर्यंत असाच सुरू होता. चालत्या कारच्या बोनेटवर महिलेला बसलेले पाहून रस्त्यावरील नागरिकांमध्ये भीती आणि कुतूहलाचे वातावरण निर्माण झाले.
अखेर नागरिकांनी सय्यद बाबा चौकाजवळ काही जणांनी ती कार थांबवली. याचवेळी काही संतप्त नातेवाईकांनी एक भलामोठा दगड स्विफ्ट कारच्या काचेवर फेकून मारला. सुदैवाने, या दगडफेकीत कारमधील तरुण-तरुणीला कोणतीही दुखापत झाली नाही आणि ते थोडक्यात बचावले. दगड खूप मोठा असल्याने मोठा अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांच्याशी दीपक पटारे, गिरीधर आसने आणि अनिल थोरात हे तात्काळ पोलीस चौकीत दाखल झाले. प्राथमिक चौकशीत हे दोन्ही तरुण-तरुणी सज्ञान असल्याचे समोर आले, पोलीस ठाण्यात दोन्ही बाजूंच्या मंडळींमध्ये चर्चा झाली. अखेर मुलाकडील व मुलीकडील नातेवाईकांकडून आमची कोणतीही तक्रार नाही, असे सांगण्यात आल्यामुळे या संपूर्ण थरारक प्रकरणावर अखेर मध्यस्थी करत प्रकरणावर पडदा पडला होता.त्यामुळे दिवसभर घटनेची चर्चा शहरासह ग्रामीण भागात त्या गावामध्ये सुरू होती. त्या दोघेनी मात्र पुढील कारवाईसाठी अर्ज केला होता, अशी माहिती मिळाली. तरूणाची प्रशासनाशी बाचाबाची झाल्याने आरसीएफ जवानांनी चोप दिला.

### प्रवरा नदी पात्रात १३ हजार क्युसेक्सने पाण्याचा विसर्ग

पांढरेशुभ्र पाणी पाहण्यासाठी परिसर आणि दूरवरून येणाऱ्या पर्यटकांची मोठी गर्दी जमू लागली आहे. ओझर बंधाऱ्याचे हे विहंगम व निसर्गरम्य दृश्य मोबाईलमध्ये टिपण्यासाठी तसेच सोशल मीडियावर रील आणि व्हिडिओ अपलोड करण्यासाठी तरुणाईची मोठी लगबग पाहायला मिळत आहे. प्रशासनाने पर्यटकांना सुरक्षेच्या दृष्टीने पात्राजवळ न जाण्याचे आवाहन केले आहे.

### जमिनीच्या वादाने हिरावला शेतकऱ्याचा जीव मृत्यूपूर्वी व्हिडिओ रेकॉर्ड करून दोघांवर गंभीर आरोप

यांच्या फिर्यादीवरून महादेव दराडे आणि चतुर्भुज दाताळ यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेने दरडवाडीसह परिसरात हळहळ व्यक्त होत असून, एका शेतकरी कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. प्रकरणाचा पुढील तपास खर्डा पोलीस करीत आहेत.

### साईभक्तांच्या विश्वासाला प्रामाणिक सेवेची जोड!

संरक्षण विभागाने आधार कार्डच्या आधारे चौकशी करून ती पर्स जी. व्ही. राजू (रा. विशाखापट्टणम, आंध्र प्रदेश) यांची असल्याचे निश्चित केले. मंदिर परिसरात उद्घोषणा करण्यात आल्यानंतर राजू संरक्षण कार्यालयात दाखल झाले. आवश्यक पडताळणी पूर्ण करून त्यांना त्यांची पर्स व संपूर्ण रक्कम सुरक्षितपणे सुपूर्द करण्यात आली. हरवलेली रक्कम परत मिळाल्याने राजू यांनी संस्थान आणि अनुपमा निरंजन यांचे मनापासून आभार मानले. अनुपमा निरंजन यांच्या प्रामाणिकपणाचा गौरव करत श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी त्यांचा सत्कार करून विशेष अभिनंदन केले. संरक्षण विभाग प्रमुख रोहिदास माळी यांच्या नेतृत्वाखाली विभागातील अधिकारी व कर्मचारी मंदिर परिसर, भक्तनिवास आणि संस्थानच्या विविध ठिकाणी सापडलेल्या रोख रक्कम, सोन्या-चांदीचे दागिने, मोबाईल, पर्स, घड्याळे आदी मौल्यवान वस्तू मूळ मालकांपर्यंत प्रामाणिकपणे पोहोचवत आहेत. या सेवेमुळे साईभक्तांचा संस्थानवरील विश्वास अधिक दृढ होत असून, प्रामाणिकपणा आणि सेवाभावाची परंपरा अधिक बळकट होत आहे. याच कार्याचा गौरव म्हणून 'राष्ट्र सह्याद्री'ने प्रसिद्ध केलेल्या वृत्तांच्या फ्रेम संबंधित कर्मचाऱ्यांच्या घरी भेट देऊन प्रदान केल्या जात आहेत. या अभिनव उपक्रमामुळे कर्मचाऱ्यांसह त्यांच्या कुटुंबीयांचाही सन्मान होत असून समाजात प्रामाणिक सेवेचा प्रेरणादायी संदेश पोहोचत आहे.

## चारीला बेकायदेशीर नळी टाकल्याने पाटबंधारे विभागाकडे तक्रार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**टाकळीभान** - पाटबंधारे विभागाची कोणतीही परवानगी न घेता अज्ञात व्यक्तीने बेकायदेशीरपणे टाकळीभान येथील चारी नंबर १६ मध्ये सिमेंटची नळी टाकून पाण्याच्या प्रवाहाला अडथळा निर्माण झाला असून सिमेंट नळी त्वरित काढून पाण्याचा प्रवाह सुरळीत करावा अशी तक्रार अर्ज आप्पासाहेब एकनाथ तगरे यांनी पाटबंधारे विभाग वडाळा महादेव यांच्याकडे केला आहे.



तक्रार अर्जात आप्पासाहेब तगरे यांनी म्हटले आहे की, टाकळीभान काही अज्ञात व्यक्तीनी जेसीबी नंबर एम. एच. १७/डी. सी. ९६६१ याने बेकायदेशिर चारीचे खोदकाम करून चारी मध्ये मोठ्या प्रमाणावर खोल खड्डे खणून चारी वरील मधील मुरमाची चोरी करून, आमच्या कुटूबांच्या नांवावर असलेल्या छअ प्लॉट मध्ये बैंकायदेशिरपणे रस्ता करण्यासाठी मुरमाची वाहतुक करून टाकला. सदर चारी मध्ये सिमेंटच्या नळ्या टाकण्यासाठी कोणत्याही कार्यालयाची परवानगी नसताना बेकायदेशीरपणे सिमेंटची नळी टाकल्यामुळे चारी मधील पाण्याला अडथळा निर्माण होवून चारी मधील पाणी फुगुन नुकसान होण्याची शक्यता आहे.

तरी आपले कार्यालया मार्फत चारी नं. १६ ची प्रत्यक्ष पहाणी करुन त्यामध्ये टाकलेली सिमेंटची नळी काढण्यात यावी व १६ चारी पुर्ववत करावी अशी मागणी अप्पासाहेब तगरे यांनी तक्रार अर्ज डरे केली आहे. तक्रार अर्ज प्रती माननीय जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर व सहाय्यक कार्यकारी अभियंता बेलपिंपळगाव यांच्याकडे पाठवल्या आहेत.

## ठाकरे गटाचे पंकज लांभाते यांच्यासह कार्यकर्त्यांचा शिंदे सेनेत प्रवेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**घोडेगाव :** नेवासा तालुक्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे घोडेगाव येथील नेवासा तालुका शिवसेना विधानसभा संघटक पंकज लांभाते यांनी आपल्या समर्थक व कार्यकर्त्यांसह राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना प्रमुख एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत (शिंदे गट) जाहीर प्रवेश केला. रविवारी (दि. २६) ठाणे येथे झालेल्या पक्षप्रवेश सोहळ्यास खासदार भाऊसाहेब वाकचौरे, विधान परिषदेचे उपसभापती आ. सचिन आहेर, आमदार विजय शिवतारे, रावसाहेब खेवरे, हरिभाऊ शेळके आदी उपस्थित होते.

यावेळी पंकज लांभाते यांनी नेवासा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले.

या पक्षप्रवेशामुळे नेवासा तालुक्यातील विशेष करून घोडेगाव परिसरात राजकीय घडामोडींना वेग आला असून माजी मंत्री शंकरराव गडाख यांना मोठा धक्का मानला जात आहे. लांभाते यांच्यासोबत अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनीही शिवसेनेत प्रवेश केल्याने शिंदे सेनेची तालुक्यातील संघटनात्मक ताकद वाढण्यास मदत होणार आहे.

## गुरुदत्त भक्तीधाममध्ये महंत भास्करगिरी महाराजांचे भक्तिभावाने स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**नेवासा :** श्री क्षेत्र पंढरपूर येथून देवगडकडे जात असताना गुरुवर्य महंत श्री भास्करगिरीजी महाराज व उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांनी अहिल्यानगर येथील संत किसनगिरीनगरमधील गुरुदत्त भक्तीधामला भेट दिली. यावेळी भाविकांच्या वतीने संतपूजन करून त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना महंत भास्करगिरी महाराज यांनी जीवनात सुख, समाधान आणि शांती मिळविण्यासाठी भगवंताचे नामस्मरण करण्याचे महत्त्व सांगितले. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या विचारांचा उल्लेख करत प्रत्येकाने भक्ती, श्रद्धा आणि सदाचाराचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहन त्यांनी केले. वारकरी संप्रदायाची परंपरा आणि पंढरपूरच्या विठ्ठलभक्तीचे महत्त्वही त्यांनी विशद केले.

महाराजांच्या आगमनानिमित्त गुरुदत्त भक्तीधाम परिसर फुलांच्या आकर्षक रांगोळीने सजविण्यात आला होता. त्यांच्या हस्ते भगवान श्री दत्तात्रयांची महाआरती करण्यात आली. त्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी हभप दुतारे महाराज, संत किसनगिरीनगर भक्त मंडळाचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.



## कमालपूर बंधारा पुन्हा पाण्याखाली
### पर्यायी मार्गावरून वाहतूक सुरू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**माळवाडगांव :** श्रीरामपूर तालुक्यातील पूर्व भागातील गोदावरी नदीवरील कमालपूर, केटीवेअर वरून वाहणारे पाणी आज सोमवारी पहाटे ओसरल्यानंतर पुन्हा सकाळी पाणी पातळीत वाढ झाल्याने बंधारा पाण्याखाली गेला. या बंधाऱ्यावरून वैजापूर गंगापूर तालुक्यातील गावाशी होणारी वाहतूक पर्यायी नागमठान पुलावरून सुरू आहे. गोदावरी नदीला २३ जुलैस मध्यरात्री पुराचेपाणी येऊन धडकल्याने नदीकाठच्या गावोगावी पुर पाहण्यासाठी गर्दी झाली. जलसंपदा विभागाच्या वतीने एक दिवस अगोदर नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा संदेश गेल्याने नागरीक व शेतकरी सावध झाले होते. कमालपूर बंधाऱ्यावरून बाजाठान शनिदेवगांव हमरापूर चेंडुफळ, गंगापूर तालुक्यातील नेवरगांव, वाहेगांव मांजरी ,या गावाचा श्रीरामपूर तालुक्याशी दैनंदिन दुध भाजीपाला,शिक्षण, विद्यार्थी संपर्क असतो. या परिसरातील दैनंदिन दळणवळण करणारे वाहने विद्यार्थी चाकरमाने पर्यायी नागमठान चांदेगांव पुलावरून जात आहे. श्रीरामपूर तालुका बंधारा मालीकेतील नाऊर, वांजरगांव, खानापूर या बंधाऱ्यापेक्षा कमालपूर बंधारा अगोदर पाण्याखाली जातो.यावेळी सर्वाधिक उंचीवर असलेले खानापूर,वांजरगांव बंधारे पाण्याखाली गेले होते.गेले तीन दिवस पाण्याखाली असलेल्या कमालपूर बंधाऱ्यावरील पाणी ओसरले होते.

शनिदेवगांव ( वैजापूर ) बाजूने बंधाऱ्याचा रस्ता भरांव तुटून पाच सहा फुट खोलवर खड्डा पडल्याने वाहने जाऊ शकली नाही.मोठी कसरत करून मोटारसायकल व पादचारी वाहतूक सुरू झाली होती.मात्र सकाळी ११ वाजता अचानक पाणी पातळीत वाढ होऊन पुन्हा वाहतूक बंद झाली. सकाळी चार तास बंधारा उघडा पडल्याने बंधारा भराव रस्ता दुरुस्ती करावी लागणार असल्याचे नदिकाठच्या नागरिकांना सावध करून दिले.

## गंगापूर नगरपरिषद अंतर्गत पहिले 'आपले सरकार सेतू सुविधा केंद्र' सुरु

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**गंगापूर :** गंगापूर नगरपरिषदेमार्फत नागरिकांना विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी सुलभपणे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'आपले सरकार सेतू सुविधा केंद्र' सुरू करण्यात आले असून, या केंद्राच्या मुख्य उद्घाटन सोहळ्याचे आयोजन नगरपरिषद गंगापूर येथे करण्यात आले.आमदार सतीशजी चव्हाण यांच्या आमदार निधीतून साकारण्यात आलेले मराठवाड्यातील नगर परिषद अंतर्गत पहिले 'आपले सरकार सेतू सुविधा केंद्र' याचे उद्घाटन आमदार सतीश चव्हाण यांच्या हस्ते संपन्न करण्यात आले.
यावेळी बोलताना आमदार सतीश चव्हाण म्हणाले की, शासनाच्या विविध सेवा नागरिकांना जलद, पारदर्शक आणि सुलभ पद्धतीने उपलब्ध व्हाव्यात, यासाठी हे केंद्र महत्त्वपूर्ण ठरणार आहे. सामान्य नागरिकांना विविध प्रमाणपत्रे व शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी होणारी धावपळ कमी होऊन सर्व सेवा एकाच छताखाली उपलब्ध होणार आहे. त्यामुळे नागरिकांचा वेळ, श्रम आणि खर्चाची मोठ्या प्रमाणात बचत होणार असून शासनाच्या सेवा अधिक परिणामकारकपणे नागरिकांपर्यंत पोहोचतील.

याप्रसंगी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष आगळे, उपनगराध्यक्ष अमोल जगताप, सर्व नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**CHANGE OF NAME**
I HAVE CHANGE MY OLD NAME
GULAAM ALI AHMED PATHAN
(Passport No.R1318138)
(BEFORE NAME)
TO THE NEW NAME AS
GULAMALI AHMED PATHAN
( AADHAR No. 5688 5025 7401)
FROM VIDE AFFADAVIT BEFORE
NOTARY PUBLIC SHIRDI
PLACE – SHIRDI
DATE – 27/07/2026

## निधन वार्ता

### शहजादी बेगम खैराती पठाण



**वैजापूर :** मुस्तफा पार्क येथील रहिवासी शहजादी बेगम खैराती पठाण (वय ८८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. शहजादी बेगम या इंजिनियर पठाण युसुफ यांच्या मातोश्री होत.

### सौ. रंजना कुमावत



**राहुरी :** येथील पत्रकार राजेंद्र परदेशी यांच्या जेष्ठ भगिनी सौ. रंजना रामलाल कुमावत (वय ७१ राहणार कात्रज, पुणे) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा,दोन मुली सुन, नातवंडे, जावई असा परिवार असून पुणे येथील पीएमटी मधील सेवानिवृत्त कर्मचारी रामलाल कुमावत यांच्या त्या पत्नी होत.

### बापूराव वाघ



**राहुरी :** वाघाचा आखाडा येथील वाघ परिवारातील एक जेष्ठ सदस्य डॉ तनपुरे कारखान्याचे सेवानिवृत्त कर्मचारी बापुराव मारुती वाघ (वय ७७) यांचें नुकतेच दुखःद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी २ मुले १ मुलगी असा परिवार आहे ते नवनाथ व बाळासाहेब यांचे वडील होत.

## निळवंडे लाभक्षेत्रातील पाझर तलाव भरून द्या
### कालवा कृती समितीची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**वाकडी :** भंडारदरा आणि निळवंडे धरणांच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे दोन्ही धरणांतील पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली असून भंडारदरा धरणातून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरू आहे. या पार्श्वभूमीवर निळवंडे धरणाच्या लाभक्षेत्रातील दुष्काळी गावांतील पाझर तलाव भरून देण्याबरोबरच उजवा व डावा कालवा तातडीने सुरू करावा, अशी मागणी निळवंडे कालवा कृती समितीने केली आहे.

समितीचे अध्यक्ष रूपेंद्र काळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले की, निळवंडे लाभक्षेत्रात अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे पाझर तलाव, ओढे-नाले कोरडे असून भुसार पिके धोक्यात आली आहेत. अशा परिस्थितीत कालव्यांमधून पुरपाणी सोडल्यास तलाव भरतील, भूजल पातळीत वाढ होईल आणि पिकांना दिलासा मिमळेल.

सध्या भंडारदरा धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरू असून अतिरिक्त पाणी प्रवरा नदीत सोडण्यात येत आहे. निळवंडे धरणातूनही नदीपात्रात विसर्ग सुरू असून आवक कायम असल्याने तो वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे या पाण्याचा लाभ दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना मिळावा, अशी समितीची भूमिका आहे.

प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे की, कालवा कृती समितीच्या दीर्घ संघर्षामुळे निळवंडे कालव्यांमधून ३१ मे २०२३ रोजी प्रथमच पाणी सोडण्यात आले होते. आता गोदावरी खोऱ्यातील वाढीव पाणी पूर्वेकडे वळविण्यासाठीही समितीने उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली असून त्यावर सुनावणी सुरू आहे. या मागणीला नानासाहेब जवरे, मच्छिंद्र दिघे, गंगाधर रहाणे, संजय गुंजाळ, कैलास गव्हाणे, उत्तमराव जोंधळे यांच्यासह कालवा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी पाठिंबा दिला आहे.

## वैजापूर तालुक्यातील १५ हजार शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**वैजापूर :** महाराष्ट्र शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना-२०२६' अंतर्गत वैजापूर तालुक्यातील १५ हजार ३५७ पात्र शेतकऱ्यांची पहिली लाभार्थी यादी जाहीर करण्यात आली असून कर्जमाफीच्या प्रक्रियेला प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. त्यामुळे कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असलेल्या हजारो शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सहायक निबंधक किरण चौधरी यांच्याकडे नुकतीच लाभार्थी यादी प्राप्त झाली असून तालुक्यातील १६२ गावांतील पात्र शेतकऱ्यांची नावे गावनिहाय प्रसिद्ध करण्यात आली आहेत. यामुळे शेतकऱ्यांना स्वतः चे नाव शोधणे सुलभ झाले असून प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यात आली आहे.

यादीत नाव असलेल्या प्रत्येक शेतकऱ्याने आधार प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे. आधार पडताळणी पूर्ण झाल्यानंतर पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. त्यामुळे जुन्या कर्जाच्या ओझ्यातून मुक्त होऊन आगामी हंगामासाठी शेतीचे नियोजन करण्यास शेतकऱ्यांना मदत होणार आहे.

प्रशासनाने सर्व पात्र शेतकऱ्यांना आपल्या गावातील लाभार्थी यादीत नाव तपासून आवश्यक कागदपत्रांसह आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संपूर्ण प्रक्रिया टप्प्याटप्प्याने राबविण्यात येत असून शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

या योजनेमुळे वाढते उत्पादन खर्च, नैसर्गिक आपत्ती आणि कर्जाच्या ओझ्यामुळे अडचणीत आलेल्या हजारो शेतकरी कुटुंबांना आर्थिक दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

**नशिबाची परिक्षा**
**मंगळवार दि .२८ जुलै २०२६**

**मिलनम डे**
उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत
१२६ १८० ११७ | ९-५ | २३० ७८० ०९०
जोड ९८-१५-३६-४७-५२

**कल्याण**
उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत
१५६ २४६ ६६० | २-४ | १४९ १३० ११२
जोड २०-९४-८१-७६-४५

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत
१२७ २८० २२६ | ०-८ | १७० १८९ ११६
जोड ०४-३८-१७ २६-८९

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

**शुभ लाभ**

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 9 | | | | |

# ‘स्मार्ट मीटर रद्द करा, ग्राहकांची लूट थांबवा’

## भाकपचे महावितरण कार्यालयासमोर जोरदार निदर्शने

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** राज्यासह जिल्ह्यात स्मार्ट इलेक्ट्रिक मीटर बसविण्याचा निर्णय तातडीने मागे घ्यावा, वीज ग्राहकांची होणारी आर्थिक लूट थांबवावी आणि वीज उद्योगाचे खासगीकरण रद्द करावे, या प्रमुख मागण्यांसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या (भाकप) वतीने शहरातील महावितरण कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. स्मार्ट मीटर रद्द करा, वीज ग्राहकांची लूट बंद करा, महावितरण होश में आओ अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

या आंदोलनात भाकपचे राज्य सचिव कॉ. ड. सुभाष लांडे, जिल्हा सहसचिव कॉ. ड. सुधीर टोकेकर, कॉ. भारती न्यालपेल्ली, भैरवनाथ वाकळे, कॉ. सतीश पवार, अविनाश साठे, संगीता कोफ्लडा, पंकज गुंदेचा, कॉ. डॉ. सुभाष कडलग, कॉ. गनी शेख, लक्ष्मीबाई कोटा, दीपक शिरसाठ, कॉ. शारदा बोगा, तुषार सोनवणे, रेखा बोगा यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि वीज ग्राहक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आंदोलनादरम्यान अनेक नागरिकांनी आपल्या वीजबिलांच्या तक्रारी मांडल्या. संबंधितांनी सांगितले की, त्यांच्या संमतीशिवाय घरांमध्ये स्मार्ट मीटर बसविण्यात आले असून त्यानंतर वीजबिलात मोठी वाढ झाली आहे. याबाबत वारंवार तक्रारी करूनही महावितरणकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याचा आरोप नागरिकांनी केला. यावेळी कॉ. सुभाष लांडे यांनी सांगितले की, आजच्या काळात वीज ही सर्वसामान्य नागरिकांची मूलभूत गरज बनली आहे. राज्यातील बहुतांश नागरिक हे मध्यमवर्गीय, शेतकरी, शेतमजूर, कामगार आणि असंघटित क्षेत्रातील कष्टकरी आहेत. अशा परिस्थितीत वीज सेवा नफेखोर खासगी कंपन्यांच्या ताब्यात देण्याचा प्रयत्न हा सर्वसामान्यांच्या हिताविरोधात असून भारतीय संविधानातील लोककल्याणकारी राज्याच्या संकल्पनेलाच बाधा पोहोचविणारा असल्याचे सांगितले.

कॉ. ड. सुधीर टोकेकर म्हणाले की, महावितरणकडून ग्राहकांची दिशाभूल करून किंवा वीजपुरवठा खंडित करण्याची भीती दाखवून स्मार्ट इलेक्ट्रिक मीटर (ढजऊ) बसविण्याची मोहीम राबविली जात आहे. वीज कायदा २००३ मधील तरतुदींनुसार कोणत्या प्रकारचे मीटर वापरायचे याबाबत ग्राहकांनाही अधिकार आहे. सरकारने यापूर्वी स्मार्ट मीटर सक्तीने लावले जाणार नाहीत, असे आश्वासन दिले होते. तसेच सर्वोच्च न्यायालयातही सक्ती केली जाणार नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आल्याचा दावा करत, प्रत्यक्षात मात्र ग्राहकांना मोबाईलवर नोटिसा पाठवून स्मार्ट मीटर स्वीकारण्यास भाग पाडले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

वीज ग्राहकांच्या संमतीशिवाय स्मार्ट मीटर बसविले जात असून त्यानंतर भरमसाठ वीजबिले आकारली जात आहेत. या वाढीव बिलांविषयी तक्रारी करूनही त्यांचे निराकरण होत नसल्यामुळे ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी आहे. ही परिस्थिती कायम राहिल्यास जनतेचा संताप वाढून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला. यावेळी महावितरण प्रशासनाला निवेदन देऊन स्मार्ट मीटर योजनेला विरोध नोंदविण्यात आला. तसेच वीज ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी सात सूत्री मागण्याही करण्यात आल्या. पंजाब आणि तामिळनाडूप्रमाणे महाराष्ट्रातही स्मार्ट मीटर न बसविण्याचा निर्णय जाहीर करावा, सन २०१४ पासून करण्यात आलेली वीजदरवाढ मागे घ्यावी, वीज उद्योगाचे खासगीकरण थांबवावे, कृषी पंपांसाठी सौरऊर्जेची सक्ती रद्द करावी, घरगुती आणि शेतकरी ग्राहकांना सामान्य मीटरद्वारे तातडीने वीजजोडणी द्यावी, शेतकऱ्यांना २४ तास अखंडित वीजपुरवठा करावा व नवीन वीजजोडणीसाठी स्मार्ट मीटरची सक्ती रद्द करून प्रस्तावित वीज विधेयक २०२५ मागे घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

राज्य सरकारने आणि महावितरणने ग्राहकांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास राज्यभर तीव्र लोकआंदोलन उभारले जाईल. वीज ही नफ्याचा विषय नसून नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे आणि त्या अधिकाराच्या संरक्षणासाठी भाकपचा लढा अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

# पंचमदा फॅन्स फौंडेशनतर्फे ३१ जुलैला ‘यादे रफी’ गीत मैफिल

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** स्वरसम्राट स्व. मोहम्मद रफी यांच्या अजरामर स्वरांची जादू पुन्हा एकदा रसिकांना अनुभवता यावी, त्यांच्या सदाबहार गीतांना संगीतमय मानवंदना देता यावी, यासाठी पंचमदा फॅन्स फौंडेशनच्या वतीने मोहम्मद रफी यांच्या ४६ व्या पुण्यतिथीनिमित्त शुक्रवार, दि. ३१ जुलै २०२६ रोजी ‘यादे रफी’ या विशेष गीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. सावेडी येथील माऊली सभागृहात सायंकाळी ६.३० वाजता ही सुरेल मैफिल रंगणार असून, रफी यांच्या गाजलेल्या चित्रपट गीतांचा बहारदार नजराणा रसिकांना अनुभवता येणार आहे.

‘झी सा रे ग म प’ फेम गायक रफी हबीब, कु. भाग्यश्री डुंभरे, संदीप भुसे आणि डॉ. सत्तार सय्यद हे आपल्या सुमधुर आवाजातून स्व. मोहम्मद रफी यांच्या लोकप्रिय गीतांची मेजवानी रसिकांसमोर सादर करणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फिनिक्स स्किन केअर हॉस्पिटलचे डॉ. राजीव सूर्यवंशी करणार आहेत. अहिल्यानगरमधील स्थानिक कलाकारांसोबत पुणे येथील कलाकारांचाही सहभाग असल्याने या मैफिलीला विशेष रंगत येणार आहे. स्व. मोहम्मद रफी यांनी आपल्या जादुई आवाजाने हिंदी चित्रपटसृष्टीला असंख्य अजरामर गीते दिली. प्रेमगीत, विरहगीत, भक्तिगीत, भावगीत, देशभक्तिपर गीत अशा विविध भावछटांनी नटलेल्या त्यांच्या गीतांनी अनेक पिढ्यांच्या मनावर अधिराज्य गाजविले. रफी यांचा स्वर हा केवळ एका काळापुरता मर्यादित न राहता आजही संगीतप्रेमींच्या मनात तितक्याच आपुलकीने रुंजी घालत आहे. त्यांच्या निधनानंतरही त्यांच्या आवाजाची मोहिनी आणि गीतांची लोकप्रियता कायम असून, याच अजरामर स्वरविश्वाची अनुभूती ‘यादे रफी’ या मैफिलीच्या माध्यमातून रसिकांना मिळणार आहे. पंचमदा फॅन्स फौंडेशन गेल्या १६ वर्षांपासून संगीत व कला क्षेत्रातील विविध उपक्रमांच्या माध्यमातून रसिकांची सांस्कृतिक अभिरुची जोपासण्याचे कार्य करीत आहे.

## द•ख•ल

### दारूसाठी पैसे न दिल्याने तरुणावर प्राणघातक हल्ला

**अहिल्यानगर :** दारू पिण्यासाठी पैसे देण्यास नकार दिल्याने एका ३१ वर्षीय मजुरावर चाकूने हल्ला करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार अहिल्यानगर शहरातील माळीवाडा परिसरात घडला आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात संशयित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की , फिर्यादी तुषार सुदाम उमाप (वय ३१ वर्ष, व्यवसाय मजूरी, सध्या रा. गाझी नगर, अहिल्यानगर) हे रविवारी (२६ जुलै) रात्री आठ वाजेच्या सुमारास माळीवाडा येथील जिल्हा परिषद इमारतीसमोरून जात होते. यावेळी संशयित आरोपी रवि उत्तम साठे (रा. भूषणनगर, केडगाव, अहिल्यानगर) याने उमाप यांना रस्त्यात अडवून दारू पिण्यासाठी पैशांची मागणी केली. फिर्यादी तुषार उमाप यांनी दारूसाठी पैसे देण्यास स्पष्ट नकार दिला. याचा राग आल्याने आरोपी रवि साठे याने उमाप यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर आरोपीने स्वतःजवळील चाकू काढून उमाप यांच्या हातावर वार करून त्यांना दुखापत केली आणि जीवे मारण्याची धमकी देऊन तेथून पळ काढला. घटनेनंतर जखमी तुषार उमाप यांनी तात्काळ कोतवाली पोलीस ठाणे गाठून घडलेल्या प्रकाराची तक्रार दिली. पोलिसांनी जखमीला उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल केले. उमाप यांच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात आरोपी रवि उत्तम साठे याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस नाईक वर्षा पंडित या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

### माळीवाडा बसस्थानकात वॉचमनवर चाकूने वार

**अहिल्यानगर :** शहरात वाढत्या गुन्हेगारीमुळे नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे. माळीवाडा बसस्थानक परिसरात क्षुल्लक कारणावरून एका ५५ वर्षीय वॉचमनवर चाकूने हल्ला करण्यात आल्याची घटना काल सायंकाळी घडली. या हल्ल्यात वॉचमन गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, इंदिरा नगर येथील रहिवासी गौतम हिरामन खरात हे वॉचमन म्हणून काम करतात. काल रात्री पावणेआठच्या सुमारास ते माळीवाडा बसस्थानक परिसरातून जात असताना चंदा नावाच्या व्यक्तीने त्यांना अडवले. आरोपीने त्यांना विनाकारण शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वाद वाढल्याने आरोपीने खिशातून चाकू काढून गौतम यांच्या उजव्या गालावर जोरदार वार केला. चाकूचा वार बसल्याने गौतम खरात हे रक्ताच्या थारोळ्यात खाली कोसळले. त्यांना जीवे मारण्याची धमकी देऊन आरोपी घटनास्थळावरून पसार झाला. आसपासच्या लोकांनी जखमीला तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल केले. घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन देशमुख आणि महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक पूनम श्रीवास्तव यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणी पीडित गौतम खरात यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी चंदा याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पोलीस अंमलदार भानुदास सोनवणे यांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून पोलीस शिपाई दीपाली भालेराव पुढील तपास करत आहेत. आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत.

### नीट-युजीमध्ये हर्ष आहेरचे यश

**अहिल्यानगर :** सिद्धिविनायक सहकारी गृहनिर्माण संस्थेचे रहिवासी श्री. मिलिंद दिलीप आहेर यांचे सुपुत्र हर्ष मिलिंद आहेर याने वैद्यकीय शिक्षणासाठी महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या छएएढ-णॠ २०२६ परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात ५८५ गुण मिळवत अखिल



भारतीय क्रमांक १५,५१३ प्राप्त केला आहे. हर्षने मिळविलेल्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. अत्यंत स्पर्धात्मक असलेल्या छएएढ परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात मिळविलेला हा यशस्वी निकाल हर्षच्या मेहनतीचे, सातत्यपूर्ण अभ्यासाचे आणि ध्येयाप्रती असलेल्या चिकाटीचे द्योतक आहे. त्याच्या या यशामुळे आहिल्यानगर जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, हर्षने जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय पातळीवर उज्ज्वल केले आहे. हर्षच्या यशामागे त्याचे आई-वडील, कुटुंबीय तसेच शिक्षकांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन महत्त्वाचे ठरले. या यशामुळे त्याच्या वैद्यकीय क्षेत्रातील पुढील वाटचालीसाठी आशादायी सुरुवात झाली आहे. हर्ष आहेर याच्या या यशाबद्दल सिद्धिविनायक सोसायटीतील रहिवासी, मित्रपरिवार, नातेवाईक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी सर्वांकडून मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# महिलांना मिळणार स्वाभिमानाचा रोजगार : कुसळकर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने केडगाव येथे ‘अहिल्या महिला उद्योजकता विकास’ अधिकृत लघुउद्योग शिवणकाम केंद्राचे उद्घाटन उत्साहात पार पडले. याचवेळी आयोजित करण्यात आलेल्या महिला रोजगार मेळाव्यास परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमामुळे महिलांना घरबसल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून, त्यांना प्रशिक्षणासह कायमस्वरूपी उत्पन्नाचा मार्ग खुला होणार आहे. महिला उद्योजकता विकास अभियानांतर्गत सेवाभावी प्रबोधन समिती, कल्याणी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, रोजगार निर्मिती अभियान आणि संजीवन उद्योग समूह यांच्या संयुक्त विद्यमाने हे केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्राच्या माध्यमातून महिलांना शिवणकामाचे व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येणार असून, प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रियेत सहभागी करून १०० टक्के रोजगाराची हमी देण्यात आली असल्याची माहिती आयोजकांनी दिली. या शिवणकाम केंद्रात महिलांकडून विविध आकारांच्या गोधड्या, साध्या व फॅन्सी कुर्त्या, रेशीम कुर्ते, पायजमे तसेच इतर वस्त्रनिर्मिती केली जाणार आहे. उत्पादनासाठी आवश्यक कच्चा माल उपलब्ध करून देण्याबरोबरच तयार मालाची खरेदी संस्थेकडून करण्यात येणार असून, त्याचा मोबदला थेट महिलांना दिला जाणार आहे. या उद्घाटन सोहळ्याला नगरसेवक विजय पठारे, संदीप देशमुख, डॉ. सुनीताताई मोडक, संदीप फुंदे, प्रशांत लोणारी, मोनिका कुसळकर, रविंद्र कुसळकर यांच्यासह परिसरातील महिला उपस्थित होत्या.

# औसरकर मळ्यात भक्तिमय दिंडी सोहळा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** आषाढी एकादशीनिमित्त औसरकर मळा येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या वतीने पारंपरिक पायी दिंडी सोहळ्याचे उत्साहात आयोजन करण्यात आले. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी झाली होती. राम कृष्ण हरी, ज्ञानोबा-तुकारामच्या अखंड जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. कार्यक्रमाची सुरुवात पहाटे काकडा भजन व महाआरतीने झाली. त्यानंतर भाविकांनी श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेत हरिनामाचा गजर करत भक्तिभाव व्यक्त केला. दुपारी श्री विठ्ठल-रुक्मिणी महिला भजनी मंडळाच्या सहभागाने रंगलेल्या भजन कार्यक्रमाने वातावरण अधिकच भक्तिमय झाले. पारंपरिक पांढऱ्या साड्यांमध्ये सहभागी झालेल्या महिलांनी वारकरी परंपरेचे दर्शन घडवत उपस्थितांची मने जिंकली. यानंतर मंदिरातून भव्य पायी दिंडीला प्रारंभ झाला. गोरव नगर, चिपाडे मळा, ओम कॉलनी, औसरकर मळा आणि नानाजी नगर या मार्गाने दिंडीची भक्तिमय मिरवणूक काढण्यात आली. टाळ-मृदंगाच्या गजरात, अभंग आणि हरिनामाच्या घोषात शेकडो वारकरी, महिला, पुरुष तसेच तरुण वर्ग मोठ्या उत्साहाने सहभागी झाला. परिसरातील नागरिकांनीही या दिंडी सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वारकऱ्यांचे स्वागत केले. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी या भक्तिमय सोहळ्याचा आनंद घेतल्याने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

यावेळी माजी नगरसेविका शितलताई जगताप यांनीही श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेत दिंडी सोहळ्यास उपस्थिती दर्शविली. त्यांनी उपस्थित भाविकांना आषाढी एकादशीच्या शुभेच्छा देत सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी श्री विठ्ठलाच्या चरणी प्रार्थना केली.




# निसर्ग व पर्यावरणाशी एकरूप होण्याचा संदेश देणारा ‘बागुल पंडुगा’

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** निसर्गाशी एकरूप होत पर्यावरणाचे संवर्धन आणि संरक्षण करण्याचा संदेश देणारा पद्मशाली समाजाचा पारंपरिक *‘बागुल पंडुगा’* सण यंदा शुक्रवार, दि. ३१ जुलै रोजी साजरा करण्यात येणार आहे. या सणाच्या माध्यमातून निसर्ग, पर्यावरण आणि मानवी जीवन यांचा अतूट संबंध अधोरेखित केला जात असून, समाजबांधवांनी या निमित्ताने वृक्षसंवर्धनाचा संकल्प करावा, असे आवाहन पद्मशाली समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. स्वाती सिरसुल यांनी केले.पद्मशाली समाजातील पूर्वजांनी भविष्यातील दूरगामी विचार करून निसर्गाचे संतुलन अबाधित राहावे, वृक्षसंपदा टिकून राहावी आणि मानवाने निसर्गाशी नेहमी एकरूप होऊन त्याचे संवर्धन व संरक्षण करावे, यासाठी विविध धार्मिक सण-उत्सवांच्या माध्यमातून समाजाला पर्यावरणपूरक संदेश दिला आहे. त्यातीलच एक महत्त्वाचा पारंपरिक सण म्हणजे ‘बागुल पंडुगा’ होय. यावेळी स्वाती सिरसुल, शामला बोरा, रंजना क्यादर, लता पुलगम, नीता मंचे, विजया बोडके, शारदा सुंकी, रत्ना कोटा, रुक्मिणी संदूपटला, भारती सुरम, सोनाली दूडम, रेणुका गाली, पद्मा म्याना, ज्योती बिज्या, सारिका म्याना, ललिता बल्लाळ, स्वरूप कुचन, अंबिका बोगा, सोनी शामल, सुनीता कुरापट्टी महिला कार्यकर्त्यांनी पद्मशाली समाज बांधव-भगिनींना बागुल पंडुगा सणाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# नवीन नेहरू मार्केटला ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व्यापारी संकुल’ नामकरणाची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** महानगरपालिकेमार्फत चितळे रोड येथे नव्याने विकसित होत असलेल्या नेहरू मार्केट (भाजी मंडई व व्यापारी संकुल) या इमारतीस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व्यापारी संकुल असे नामकरण करण्यात यावे, तसेच शहरात लागू करण्यात आलेल्या घरपट्टीबाबत राज्यातील ड वर्ग महानगरपालिका क्षेत्रातील घरपट्टीचा अभ्यास करून सुधारित पद्धतीने अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी नगरसेविका मयुरी जाधव यांनी महापौर ज्योतीताई गाडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नगरसेविका मयुरी जाधव यांनी म्हटले आहे की, चितळे रोडवरील नव्याने विकसित होत असलेल्या नेहरू मार्केट (भाजी मंडई व व्यापारी संकुल) या महत्त्वपूर्ण इमारतीस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व्यापारी संकुल असे नाव देण्यात यावे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या भारतीय इतिहासातील आदर्श, न्यायप्रिय, लोककल्याणकारी आणि दूरदृष्टीच्या राज्यकर्त्या म्हणून संपूर्ण देशात गौरविल्या जातात. यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेला संभ्रम दूर होण्यास मदत होईल, घरपट्टी आकारणी अधिक पारदर्शक, न्याय्य आणि नागरिकाभिमुख होईल, तसेच सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळेल, असा विश्वास नगरसेविका मयुरी जाधव यांनी व्यक्त केला.

# बुवाजी बुवा मंदिरात भाविक उपवास सोडायला आले

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** आषाढी एकादशीचा उपवास सोडण्यासाठी द्वादशीला साक्षात पांडुरंग उपवास सोडायला अरणगाव(मेहराबाद)येथील संत बुवाजी बुवा महाराज मंदिरात येतात अशी आख्यायिका आहे. त्यामुळे दिवसभर परिसरातील व नगरमधील सुमारे २७ हजार भाविक उपवास सोडण्यासाठी आले होते. संतांची पावन भूमी असलेल्या नगरजवळील अरणगांव येथे श्री संत बुवाजीबुवा महाराज यांची संजीवन समाधी असलेल्या पुण्यभूमीत आषाढी सप्ताह, अखंड हरीनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा संपन्न झाला.

आषाढी एकादशीची पूजा संपन्न झाली,द्वादशीचा उपवास सोडण्यासाठी सुमारे २७ हजार भाविक आले होते. द्वादशी महाप्रसादचे अन्नदाते अरणगावचे महेश विठ्ठल गहिले, बाळासाहेब नारायण जाधव, श्री. संजय काका भाटी (शिरूर) यांच्यातर्फे भात ,आमटी व लापशीचा प्रसाद बनविण्यात आला. दुपारी १२ वा सुरु झालेला महाप्रसाद रात्री १० वाजेपर्यंत चालू होता त्याचा लाभ भविकांनी घेतला.सर्व नियोजन देवस्थान ट्रस्ट व ग्रामस्थांनी केले होते.

# ‘फिरोदिया शिवाजियन्स’ फुटबॉल स्पर्धेला सुरुवात

## आठरे पाटील स्कूलचे वर्चस्व ; ऑक्झिलियम कॉन्व्हेंट आणि आयकॉन पब्लिक स्कूलचे तीन सामने अनिर्णित

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील शालेय फुटबॉलपटूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी उपलब्ध करून देणाऱ्या फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेला सोमवारी उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर फुटबॉलचा थरार रंगला असून, पहिल्याच दिवशी विविध वयोगटांतील सहा सामने खेळविण्यात आले. या सामन्यांमध्ये आठरे पाटील स्कूलने तीनही सामन्यांत विजय मिळवत आपले वर्चस्व सिद्ध केले, तर ऑक्झिलियम कॉन्व्हेंट आणि आयकॉन पब्लिक स्कूल यांच्यातील तीन सामने अत्यंत अटीतटीचे होत दोन अनिर्णित आणि एक बरोबरीत सुटला.

अहमदनगर महाविद्यालयाच्या सौजन्याने तसेच अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन (एडीएफए) यांच्या सहकार्याने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत जिल्ह्यातील विविध नामांकित शाळांचे संघ मोठ्या उत्साहाने सहभागी झाले असून मैदानावर सुरुवातीपासूनच क्रीडाप्रेमींची उत्स्फूर्त उपस्थिती पाहायला मिळाली.




स्पर्धेतील उद्घाटनाचा सामना १६ वर्षांखालील मुलांच्या गटात आठरे पाटील स्कूल आणि अशोकभाऊ फिरोदिया स्कूल यांच्यात खेळविण्यात आला. या सामन्यात आठरे पाटील स्कूलने उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करत ३-१ अशा फरकाने विजय मिळविला. आठरे पाटीलकडून शौर्य भंडारीने १७ व्या मिनिटाला पहिला गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर सोमनाथ तावडेने २४ व्या मिनिटाला दुसरा गोल करत आघाडी भक्कम केली. सामन्याच्या उत्तरार्धात अशोक चंदने ५५ व्या मिनिटाला तिसरा गोल झळकावत विजयावर शिक्कामोर्तब केले. अशोकभाऊ फिरोदिया स्कूलला केवळ एकच गोल करण्यात यश आले.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटातही आठरे पाटील स्कूलने विजयी परंपरा कायम राखली. अशोकभाऊ फिरोदिया स्कूलविरुद्धच्या या सामन्यात देहान जाधवने २२ व्या मिनिटाला केलेला एकमेव गोल निर्णायक ठरला. संपूर्ण सामन्यात आठरे पाटीलच्या बचावफळीने भक्कम कामगिरी करत प्रतिस्पर्धी संघाला एकही गोल करू दिला नाही आणि १-० असा विजय नोंदविला. १६ वर्षांखालील मुलींच्या गटात आठरे पाटील स्कूल आणि पोदार स्कूल यांच्यात अत्यंत रंगतदार सामना झाला. दोन्ही संघांनी आक्रमक खेळ करत प्रेक्षकांची मने जिंकली. आठरे पाटील स्कूलकडून इरम कडूस आणि प्रांजल भोर यांनी प्रत्येकी एक गोल करत संघाला २-१ असा विजय मिळवून दिला. पोदार स्कूलकडून काव्या झावरे हिने एकमेव गोल नोंदविला.

# द•ख•ल

## जुन्नरमध्ये भर पावसात नदी पात्रात उतरून वीजपुरवठा केला सुरळीत

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** महावितरण कर्मचाऱ्यांच्या कर्तव्यनिष्ठेचे आणि धाडसाचे एक कौतुकास्पद उदाहरण जुन्नर तालुक्यात समोर आले आहे. मुसळधार पाऊस आणि पुराचा धोका असतानाही, वीज कर्मचाऱ्यांनी स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने मीना नदीच्या पात्रात उतरून तुटलेल्या वीजवाहिन्या दुरुस्त केल्या आणि वीजपुरवठा यशस्वीपणे सुरळीत केला आहे. महावितरणच्या या कर्तव्य तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.



२३ जुलै २०२६ रोजी जुन्नर पश्चिम भागात झालेल्या मुसळधार पाऊस आणि वादळामुळे आपटाळे शाखा कार्यालयांतर्गत येणाऱ्या मौजे सोनावळे (निगळे वस्ती) येथील लघुदाब वाहिनीच्या तारा तुटून थेट मीना नदीच्या पात्रात पडल्या होत्या. नदीला पूर आल्यामुळे आणि पाण्याचा प्रवाह अत्यंत वेगवान असल्याने सुरक्षेचा उपाय म्हणून तात्काळ काम करणे शक्य झाले नव्हते. त्यातच पुढील काही दिवस या भागात सलग पाऊस सुरू असल्याने दुरुस्तीच्या कामात मोठे अडथळे येत होते.नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी आणि वीजपुरवठा लवकरात लवकर पूर्ववत करण्यासाठी आपटाळे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी रविवारी (२६ जुलै) भर पावसात मोहीम हाती घेतली. पाण्याचा प्रवाह सुरू असतानाही कर्मचाऱ्यांनी स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने अत्यंत धाडसाने नदी पात्रात प्रवेश केला. वाहत्या पाण्यातून तुटलेल्या तारा बाहेर काढून, त्या व्यवस्थित ओढून रविवारीच या परिसराचा वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला.

## पवार यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** दिवंगत उपमुख्यमंत्री तथा लोकनेते स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त बारामती शहरात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून बारामती नगरपरिषद शाळा क्रमांक ६ येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.या उपक्रमाचे आयोजन अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद, महिला शहराध्यक्ष उर्मिला म्हेत्रे यांच्या वतीने करण्यात आले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना वह्या, पेन तसेच इतर आवश्यक शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष ड. किरण इंगळे यांच्या हस्ते शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मनापासून अभ्यास करून उज्ज्वल भविष्य घडविण्याचे आवाहन केले. समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अशा उपक्रमांचे महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष अभिजीत घाडगे, विद्यार्थी अध्यक्ष मेघराज माने, जनसंपर्क अधिकारी सुरज देवकाते, उषा भोसले, सुलताना पठाण, सुनीता मोटे, आशा जगताप, प्रांजल भोसले, आशा जगताप या सह पदाधिकारी उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत नियमित अभ्यास, शिस्त आणि सामाजिक जाणीव जोपासण्याचा संदेश दिला. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांना हातभार लावणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

## स्कॉलरशिप परीक्षेत भूमी फाउंडेशनच्या विद्यार्थिनीचे यश




प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**वाघोली :** भूमी फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य सामाजिक संस्थेच्या वाघोली येथील निवासी प्रकल्पातील विद्यार्थिनी श्रावणी सारंगधर इंगळे हिने शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप) परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण होत संस्थेच्या शैक्षणिक कार्यात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.श्रावणीच्या यशामागे तिची अथक मेहनत, जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यास याबरोबरच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बकोरीच्या मुख्याध्यापिका ज्योती माने, वर्गशिक्षिका अश्विनी भोसले, शालेय व्यवस्थापन समिती तसेच भूमी फाउंडेशनच्या प्रकल्प संचालिका अनिता पवार यांचे वेळोवेळी लाभलेले मार्गदर्शन आणि सहकार्य मोलाचे ठरले.या उल्लेखनीय यशाबद्दल भूमी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. कैलास पवार आणि प्रकल्प संचालिका अनिता पवार यांच्या हस्ते निवासी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत श्रावणीचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. कैलास पवार यांनी माध्यमांशी संवाद साधताना ग्रामीण व गरजू विद्यार्थिनींना योग्य संधी, दर्जेदार मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण प्रोत्साहन मिळाल्यास त्या कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होऊ शकतात, असा विश्वास व्यक्त केला. त्यांनी श्रावणीचे अभिनंदन करत तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी सिंदूर ऑपरेशनचे योद्धा देवेंद्र औताडे, नवचैतन्य हास्य योग परिवाराचे संस्थापक अध्यक्ष विठ्ठल काटे, सुमन काटे, पोपटलाल सिंघवी, दत्तात्रय कुंदे, डॉ. अमित कुमार दुबे, कॅप्टन जे. के. अरविंद, वायुसेना अधिकारी एस. के. पांडे, नेव्ही अधिकारी शिओ मिश्रा, शास्त्रज्ञ डॉ. एन. एस. मानकर, डॉ. रघुनाथ रामकर, डॉ. अविनाश शर्मा, अशोक घायाळ पाटील, राजन खेडेकर आणि धनराज वाळके यांच्यासह भूमी फाउंडेशनचे पदाधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व हितचिंतक उपस्थित होते.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

विशेष वृत्त। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत आपले नाव आलेल्या शेतकऱ्यांनी आपले सरकार सेवा केंद्रावर जावून आपले आधार प्रमाणीकरण करुन घेण्याचे आवाहन पुणे ग्रामीण सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक प्रकाश जगताप यांनी केले आहे.

**आपले सरकार सेवा केंद्रावरील आधार प्रमाणीकरण करुन घ्या- जिल्हा उपनिबंधक प्रकाश जगताप**

आधार प्रमाणीकरणाकरणाची सुलभ कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असून शेतकऱ्यांनी केंद्र चालकास आधार क्रमांक किंवा कर्जमुक्ती यादीतील त्याच्या नावासमोरचा विशिष्ट क्रमांक सादर करावा. केंद्र चालकाने शेतकऱ्यांच्या विशिष्ट क्रमांक किंवा आधार क्रमांकाद्वारे शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक (Agristack) नोंदणी पोर्टलवरून तपासावी शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक नोंदणी झाली नसल्यास केंद्र चालकाने शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक पोर्टलवर नोंदणी करावी. केंद्र चालकाने शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक नोंदणी झाल्याची खात्री झाल्यानंतर शेतकऱ्यांचा कर्ज खात्याचा तपशील प्राप्त करावा.

केंद्र चालकाने संगणक पटलावर दिसत असलेल्या आधार क्रमांक, कर्ज खाते क्रमांक व कर्ज खात्यातील थकीत रकमेबाबत शेतकऱ्यांकडून खात्री करून घ्यावी. शेतकऱ्यांनी सर्व माहितीस सहमती दर्शवल्यास: बायोमेट्रिक पद्धतीने प्रमाणीकरण करावे. Agree d Submit ही प्रक्रिया पूर्ण करावी व प्रणालीवरून प्राप्त झालेली पावती शेतकऱ्याला द्यावी.

**शेतकऱ्याची आधार क्रमांकाबाबत असहमती असल्यास –** केंद्र चालकाने प्रथमतः शेतकऱ्याचे मूळ आधारकार्ड तपासावे. त्यानंतर योग्य आधार क्रमांक नोंदवून शेतकऱ्याचे बायोमेट्रिक पद्धतीने आधार प्रमाणीकरण करावे. आधार क्रमांक चुकीचा असल्याची नोंद घ्यावी. याबाबतची तक्रार जिल्हास्तरीय समितीकडे पाठविल्याची माहिती द्यावी व प्रणालीवरून प्राप्त झालेली तक्रार पावती शेतकऱ्यास द्यावी.

**शेतकऱ्याची कर्ज रक्कम किंवा कर्ज क्रमांकाबाबत असहमती असल्यास** – केंद्र चालकाने प्रथमतः शेतकऱ्याचे बायोमेट्रिक पद्धतीने आधार प्रमाणीकरण करावे. त्यानंतर कर्जखात्याच्या तपशीलबाबत असहमतीची नोंद करावी. याबाबतची तक्रार जिल्हास्तरीय समितीकडे पाठविल्याची माहिती द्यावी व प्रणालीवरून प्राप्त झालेली तक्रार पावती शेतकऱ्यास द्यावी.

शेतकऱ्यांच्या बोटांचा ठसा वापरून प्रमाणीकरण नोंदविता येत नसल्यास इतर बोटांचे ठसे वापरून दोन ते तीन वेळा प्रयत्न करावा. त्याद्वारेसुद्धा प्रमाणीकरण होत नसल्यास Unable To -uthenticate हा पर्याय वापरून केंद्र चालकाने स्वतःच्या बोटांद्वारे आधार प्रमाणीकरण करावे. याबाबतची तक्रार तहसीलदार यांच्याकडे दाखल करता येईल. प्रणालीवरून प्राप्त झालेली तक्रार पावती शेतकऱ्यास द्यावी, अशी माहिती श्री. जगताप यांनी दिली आहे.

## आचार्य अत्रे शिक्षक, शिक्षकेतर सेवकांच्या पतसंस्थची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस :** पश्चिम महाराष्ट्रात सहकार चळवळीमुळे शेतकरी व कामगार यांची सामाजिक प्रतिष्ठा वाढली. छोट्या पतसंस्था मोठ्या होत आहेत. आचार्य अत्रे शिक्षक व शिक्षकेतर सेवकांची सहकारी पतसंस्था शिक्षकांची अर्थवाहिनी बनत आहे. आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय दादा कोलते यांच्या प्रेरणेतून ही पतसंस्था उभी राहिली. या पतसंस्थेच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात याचा मला मनस्वी आनंद होत आहे. स्वर्गीय नामदार अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून व पतसंस्थेच्या रोप्य महोत्सवी वर्षानिमित्त ५ ०० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. हा पतसंस्थेचा स्तुत्य उपक्रम आहे असे प्रतिपादन आचार्य प्रतिष्ठानचे सचिव शांताराम बापू पोमण यांनी पतसंस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षा निमित्त पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत व्यक्त केले. याप्रसंगी आचार्य अत्रे प्रतिष्ठानचे सहसचिव बंडूकाका जगताप यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले तसेच संस्थेचे सहसचिव गौरव भाऊ कोलते यांनी पतसंस्थेच्या रोप्य महोत्सवी वर्षानिमित्त शुभेच्छा दिल्या.

पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने पतसंस्थेचे अध्यक्ष शांताराम कोलते यांनी पतसंस्थेच्या कार्याचा आढावा प्रास्ताविकाच्या माध्यमातून घेतला. पतसंस्थेला एकूण ३७५७१९८ रुपये एवढा नफा झाला असून सभासदांना नऊ टक्के लाभांश देण्यात आला.यावेळी सभासद पाल्यांचा गुणगौरव सन्मानचिन्ह व रोख रक्कम देऊन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत जेष्ठ संचालक वसंतराव ताकवले यांनी केले. पतसंस्थेचे अहवाल वाचन सचिव चौरंगनाथ कामथे यांनी केले. याप्रसंगी डॉ. राजेश दळवी, पतसंस्थेचे संचालक डॉ. धनाजी नागणे, बाळू खोमणे, अर्जुन शेंडगे, प्रदीप दुर्गाडे, किशोर भालेराव, अशोक बाणे, वैशाली इंदलकर, सुरेखा जगताप, रामदास वाघ, व्यवस्थापक दिलीप पापळ व सभासद उपस्थित होते. या सभेचे सूत्रसंचालन सचिन धनवट यांनी केले व आभार प्रशांत जगताप यांनी मांनले.




## आजी माजी सैनिक संघटना वतीने कारगिल विजय दिवस साजरा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**सोमेश्वरनगर :** १९९९ साली झालेल्या युद्धात प्राण अर्पण करणाऱ्या भारतीय सैनिकांच्या शौर्य आणि बलिदानाचा सन्मान असतो. या दिवसाचे उद्दिष्ट तरुणांमध्ये देशभक्ती, अभिमान, आणि कृतज्ञेची भावना निर्माण करणे आणि राष्ट्रीय एकता आणि त्यागाची भावना बळकट करणे म्हणून देशभर हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत असतो.२६ जुलै रोजी आजी माजी सैनिक संघटना बारामती तालुका मुख्य शाखा सोमेश्वरनगर ऑफिस कार्यालय येथे दर वर्षी कारगिल विजय दिवस साजरा करण्यात येत असतो या अनुषंगाने रविवारी दि २६ रोजी कारगील विजयोत्सव सैनिक संघटना कार्यालयात साजरा करणेत आला... कारगील मधील शहीदांना श्रद्धांजली वाहून ...भारत माता की जय.. पाकिस्तान मुर्दाबाद.. च्या घोषणा देण्यात आल्या.

यावेळी अध्यक्ष ताराचंद शेंडकर, ड गणेश आळंदीकर ,उपाध्यक्ष भगवान माळशिकारे,कार्याध्यक्ष बाळासाहेब गायकवाड, जेष्ठ राजाभाऊ थोपटे,मीनानाथ होळकर,विक्रम लकडे व गणेश शेंडकर इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

## अनुसूचित जाती वर्गातील ५९ जातींचा जिल्हाधिकारीं कार्यालयावर धडकला मोर्चा

**जनगणनेनंतरच अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करण्याची 'महामोर्चाद्वारे रिपब्लिकन पक्षाची आग्रही मागणी**

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** अनुसूचित जातीमध्ये उपवर्गीकरण करण्याचा निर्णय राष्ट्रीय जातनिहाय जनगणनेनंतरच अचूक लोकसंख्येच्या प्रमाणानुसार अमलात आणावा, या मागणीसाठी रिपब्लिकन पक्ष आठवले गटाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालया नजीकच्या आंबेडकर पुतळ्यापासून भव्य महामोर्चा काढण्यात आल्या. पक्षाचे पुणे शहर, पिंपरी चिंचवड शहर आणि पुणे ग्रामीण जिल्हयातील पदाधिकारी, कार्यकर्ते व ५९ जातींमधील नागरिक भर पावसात उत्साहाने या मोर्चात सहभागी झाले.



या मोर्चात पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर, पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, पिंपरी चिंचवड अध्यक्ष कुणाल न्हावळकर, पुणे जिल्हा अध्यक्ष श्रीकांत कदम, महिला आघाडी अध्यक्ष चंद्रकांता सोनकांबळे, प्रदेश उपाध्यक्ष हुलगेश चलवादी, बाळासाहेब भागवत, संगीता आठवले प्रदेश सचिव सूर्यकांत वाघमारे, कार्याध्यक्ष बसवराज गायकवाड, सरचिटणीस महिपाल वाघमारे, नगरसेविका हिमाली कांबळे, सरचिटणीस श्याम सदाफुले, पुणे जिल्हा कार्याध्यक्ष शिवाजीराव मखरे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शशिकला आठवले, कालिदास गायकवाड, अर्जुन आल्हाट, विनोद टोपे, संतोष खरात, मंगल रासगे, सुन्नाबी शेख, शोभा झेंडे, मीना गालटे, चांदणी गायकवाड, मीनाज मेमन, वसंत वाघमारे, क्रिस्टोपर राजमनी, डोर्थी थॉमस, संदीप धाडोरे, आशिष भोसले, सशाक माने, अविनाश कादम, अविनाश गायकवाड, अंकिता भालेराव, रेशमा शेख, शिवाजी उजागरे, संजय पटणपल्लू, विशाल शेळके, उमेश कांबळे, प्रवीण ओव्हाल, आकाश बहुले, भारत पवार, सुनिल गवळी, अक्षय अवसरमल, फिरोज खान, निलेश रोकडे, हनुमंत गायकवाड, अतुल भालेराव, नारायण गायकवाड, सशाक माने, मिलिंद बनसोडे, हर्षा लोंढे, हर्षा गायकवाड, अयुब जहागीरदार, संग्राम साळवे, संग्राम घंगाले, सुनिल नाईकनवरे, दिनेश नहारिया, बापू बाराथे, अभिमन्यू सूर्यवंशी, सुदर्शन कांबळे, गौतम कदम, मिट्टू वाघमारे, ईश्वर ओव्हाळ, सिकंदर सूर्यवंशी, यांच्यासह कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. बौद्ध समाज आणि इतर अनुसूचित जाती जमाती मधील ऐक्य व्यक्त करणाऱ्या घोषणा या मोर्चात देण्यात आल्या.अनुसूचित जातींतील ५९ समाजघटकांमध्ये सामाजिक ऐक्य टिकवून ठेवणे ही रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)ची ठाम भूमिका आहे. उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेमुळे कोणत्याही समाजघटकात मतभेद किंवा दुरावा निर्माण होऊ नये, यासाठी ती प्रक्रिया राष्ट्रीय जातीय जनगणना पूर्ण झाल्यानंतरच राबविण्यात यावी. जनगणनेतील लोकसंख्येच्या अचूक आकडेवारीच्या आधारेच न्याय्य निर्णय घेणे शक्य होणार आहे. अनुसूचित जातींतील विविध समाजघटकांनी सामाजिक न्याय, समान हक्क आणि आरक्षणासाठी अनेक दशकांपासून एकत्रितपणे संघर्ष केला आहे. त्यामुळे कोणताही निर्णय घाईघाईने घेण्याऐवजी वस्तुनिष्ठ माहितीच्या आधारे घेणे आवश्यक आहे. प्रत्येक जातीची अचूक लोकसंख्या जनगणनेतून समोर आल्यानंतरच उपवर्गीकरणाबाबत धोरण निश्चित केल्यास सर्व समाजघटकांना न्याय मिळू शकेल. राज्यातील उर्वरित ५८ अनुसूचित जातींनाही शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये समान संधी मिळाव्यात, ही पक्षाची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# 'तारपा'साठीच आमची वंशावळ : भिकल्या लाडक्या धिंडा यांची भावना

**ढोल-ताशा वादक संस्कृती कडून पद्मश्री तारपा वादक भिकल्या लाडक्या धिंडा यांचा सन्मान**

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** आमचा पणजोबा, नवश्या, आजोबा धाकल्या हे तारपा वाद्य वाजवायचे. त्यानंतर धाकल्याचा मुलगा लाडक्या, नि लाडक्याचा मुलगा मी, भिकल्या, तारपा वाजवतो. हे वाद्य आमची वंशावळ आहे. आता माझ्या नातू, पणतू शिकत आहेत. त्यांच्याबरोबर साठ-सत्तर लोक शिकवले, अशी भावना प्रसिद्ध तारपावादक भिकल्या लाडक्या धिंडा यांनी व्यक्त केली. देवाने आपल्याला जन्म दिला. मनाला विचारून आपण विचार करायचा असतो. विचारांनी आचार केला, तरच विकास होतो, असेही त्यांनी सांगितले.रुद्रांग वाद्यपथक ट्रस्ट, पुणे यांच्या दशकपूर्ती निमित्त आयोजित वाद्यपूजन सोहळ्याप्रसंगी पद्मश्री तारपा वादक भिकल्या लाडक्या धिंडा यांचा सत्कार यांचा सत्कार करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते.

रुद्रांग वाद्यपथक ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित वाद्यपूजन सोहळ्यात आमदार हेमंत रासने, दिपकभाऊ नागपुरे, नगरसेवक राजेंद्र काकडे, नगरसेवक अपूर्व खाडे, नगरसेविका पुजा जागडे, अभिनेते रमेश परदेशी(पिट्याभाई ), नितीन पंडीत, आशिष कांटे, देवेंद्र वडके, अमित पळसकर,शिरीष थिटे, गणेश देशपांडे, मयुर ढमाले, यांच्यासह शहरातील विविध वाद्यपथकांतील, गणेशोत्सव मंडळांतील पदाधिकारी उपस्थित होते. याच कार्यक्रमात ट्रस्टचे अध्यक्ष अमर भालेराव यांनी पद्मश्री तारपा वादक भिकल्या लाडक्या धिंडा यांची माहिती आणि ट्रस्टच्या वतीने घेण्यात येणार्या 'इन्स्टाग्राम रील' स्पर्धेची माहिती दिली.



पुण्याच्या गणेशोत्सवाची ख्याती जगभर आहे आणि ढोल-ताशा ही पुण्याची संस्कृती आहे. आम्ही ढोल-ताशा वादक आहोत म्हणून रुद्रांग वाद्यपथक ट्रस्ट, पुणे यांच्या दशकपूर्ती निमित्त एका संस्कृतीकडून आणि वादकाकडून दूसर्या वादक संस्कृतीचा सन्मान व्हावा याच उद्देशाने पद्मश्री तारपा वादक भिकल्या लाडक्या धिंडा यांचा सत्कार करण्यात आला, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष अमर भालेराव यांनी दिली.सदर कार्यक्रमाचे आयोजन ट्रस्ट अध्यक्ष अमर भालेराव ,श्रीनिवास निगडे ,अमोल शुक्ल ,तुषार दामगुडे ,अमित घुले ,निलेश वावरे यांनी केले आणि ढोल ताशा महासंघाचे अध्यक्ष पराग ठाकूर यांनी मार्गदर्शन केले . महाराष्ट्राची संस्कृती जतन करण्याचे कार्य आपलेच आहे, तेच कार्य आम्ही केले आहे.

धिंडा म्हणाले, आमचा तारपा देवासाठी वाजतो. देवकार्याचं वाद्य आहे. हे वाद्य श्वासाने वाजतं. वारा येतो, तेव्हा झाड हलतं, तसं तारप्याला श्वास दिला की ते वाजतं. माडाचं पान, दोन बांबू आणि त्याला दुधी जोडलेली, असं हे वाद्य बनवलं जातं. तारप्यात नर आणि मादी आहे. शरीराला जेवढा श्वास, तेवढा श्वास या दोन्हींनाही घालायचा. गणेशोत्सवाला १३५ वर्षांची भव्य परंपरा आहे. सुरुवातीला कार्यकर्ते स्वतः मंडप घालायचे, सजावट करायचे. लोकवर्गणी केली जायची. दोन महिने आधी उत्सव आल्याची जाणीव व्हायची. आता वाद्यपथकांची उद्घाटने झाली की, गणेशोत्सव आला असे वाटते. प्रत्येक वेळी टप्पा बदलत गेला. या काळात धर्म-संस्कृती-परंपरा जपण्याचे काम गणेशोत्सवाने केले आहे, असे मत रासने यांनी व्यक्त केले.

# श्रीगोंदा तालुक्यात पावसाने फिरवली पाठ

## शेतकऱ्यांच्या नजरा आता आभाळाकडे!

### पेरण्या, ऊस लागवड, चारा व पिण्याच्या पाण्याची चिंता; जिरायती भागात मशागतीही ठप्प

**दादा सोनवणे। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यात यंदाच्या पावसाने शेतकऱ्यांची मोठी निराशा केली आहे. जूनच्या सुरुवातीला झालेल्या पावसामुळे चांगल्या हंगामाची आशा निर्माण झाली होती; मात्र त्यानंतर पावसाने पूर्णपणे ओढ दिल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. जिरायती भागात अद्याप मशागतीलाही पुरेसा पाऊस झालेला नाही, तर अनेक ठिकाणी खरीप पेरण्या खोळंबल्या आहेत. ज्यांनी



धाडस करून पेरण्या केल्या आहेत, त्या पिकांनाही आता पावसाची नितांत गरज भासत आहे. श्रीगोंदा तालुक्यातील अनेक गावांमध्ये विहिरींची पाणीपातळी झपाट्याने घटत असून नाले, ओढे आणि तलाव कोरडे पडू लागले आहेत. त्यामुळे शेतीबरोबरच पिण्याच्या पाण्याची आणि जनावरांच्या चाऱ्याची चिंता वाढली आहे. हिरवा चारा उपलब्ध नसल्याने पशुपालकही अडचणीत आले आहेत.बागायती पट्ट्यातील शेतकरीही संभ्रमात आहेत. आडसाली ऊस लागवडीसाठी सऱ्या तयार असूनही पावसाचा भरोसा नसल्याने लागवड पुढे ढकलली जात आहे. खरीप हंगाम हातातून निसटण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.गेल्या काही दिवसांपासून ढगाळ वातावरण, जोरदार वारे आणि अधूनमधून रिमझिम सरी एवढेच चित्र दिसत आहे. दमदार पाऊस मात्र होत नसल्याने शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे. हवामान विभागाकडून पावसाचा अंदाज व्यक्त होत असला तरी प्रत्यक्षात पाऊस न झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

**आभाळ भरून येतं... पण बरसत नाही!**

- खरीप पेरण्या रखडल्या
- जिरायती भागात मशागती ठप्प
- ऊस लागवड धोक्यात
- विहिरींची पातळी घटली
- चारा व पिण्याच्या पाण्याची चिंता वाढली
- शेतकऱ्यांचे लक्ष आता फक्त दमदार पावसाकडे आहे.

सध्या श्रीगोंदा तालुक्यातील शेतकऱ्यांची नजर केवळ आकाशाकडे लागली असून, पुढील काही दिवसांत दमदार पाऊस झाला नाही तर खरीप हंगामासह पशुधन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# अनापवाडी जि. प. शाळेत बाल वारकऱ्यांची दिंडी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** आषाढी एकादशीनिमित्त अनापवाडी (ता. राहुरी) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत बाल वारकऱ्यांची भक्तिमय दिंडी मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक वातावरणात पार पडली. वारकरी वेशभूषेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी हातात टाळ, मृदुंग, भगवे ध्वज आणि तुळशीची रोपे घेऊन विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषात दिंडी काढत परिसर भक्तिरसाने भारावून टाकला.



विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीची, परंपरेची आणि विविध सण-उत्सवांचे महत्त्व समजावे तसेच वारकरी संप्रदायातील भक्ती, समता आणि सामाजिक ऐक्याचे संस्कार बालवयातच रुजावेत या उद्देशाने शाळेच्या वतीने या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या परिसरातून निघालेल्या दिंडीत विद्यार्थ्यांनी विठ्ठलनामाचा अखंड गजर करत अभंग, हरिपाठ आणि भजनांच्या तालावर उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाला सुनील कोंडीराम माळी, समर्थ अनाप, रोहिदास कानडे, एजाज तांबोळी, नारायण अनाप, संदीप अनाप, विलास मोरे, कुमार अंत्रे, राजेश अंत्रे, गेनू भाऊ अनाप, संजय सजन, बाळासाहेब अनाप, अलका अनाप, धनवट मॅडम, दिघे मॅडम, सुरेखा अनाप, शुभांगी अंत्रे, शकुंतला अनाप, सविता अनाप तसेच पालक, ग्रामस्थ आणि शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या समारोपानंतर सर्व उपस्थितांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी शाळेचे शिक्षक वायदंडे, घोलप यांनी दिंडी यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणारे शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, पालक, ग्रामस्थ, शिक्षक आणि सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

## द•ख•ल

### विद्यार्थांनी केले लोकशाही पध्दतीचे मुल्य आत्मसात



**ढोरजळगांव :** विद्यार्थ्यांना लोकशाही प्रक्रियेचे प्रत्यक्ष ज्ञान मिळावे, मतदानाचे महत्त्व समजावे आणि जबाबदार नागरिकत्वाची जाणीव व्हावी या उद्देशाने निर्मल ब्राईट फ्युचर स्कूलमध्ये विद्यार्थी प्रतिनिधी निवडणुकीचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. या निवडणूक प्रक्रियेचे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून शाळेचे प्राचार्य दत्तात्रय मोरे यांनी जबाबदारी पार पाडली. मतदान केंद्र अध्यक्ष म्हणून बाळू निळ व श्रीम. या सर्व प्रक्रियेत श्रीम. शुभांगी मरकड यांचे सहकार्य लाभले.बूथ लेव्हल ऑफिसर म्हणून बनसोडे व श्रीम आम्रपाली पुरनाळे यांनी मतदानाची संपूर्ण व्यवस्था सांभाळली. तसेच निवडणूक शांततापूर्ण, पारदर्शक आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडावी यासाठी आशिष मेहत्रे यांनी मोलाची भूमिका बजावली. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने मतदानाचा हक्क बजावत लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदविला. प्रत्यक्ष मतदानाचा अनुभव घेत विद्यार्थ्यांनी लोकशाही मूल्ये आत्मसात केली.

### जनकल्याण मराठी पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्षपदी बाफना

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी येथील रहिवासी आणि सध्या अहिल्यानगर येथे वास्तव्यास असलेले शांत, संयमी व तत्त्वनिष्ठ पत्रकार प्रशांत बाफना यांची जनकल्याण मराठी पत्रकार संघाच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याचे पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संतोष जाधव यांनी त्यांना दिले आहे. पत्रकारिता सध्याच्या डिजिटल आणि पेडन्यूजच्या जमान्यात बाफना यांची ओळख निर्माण झाली असून समाजाच्या तळागाळापर्यंत पोहचून तेथील सकारात्मक कार्य, विचार आणि बातमीच्या माध्यमातून सर्वदूरपर्यंत पोहोचविण्याचे काम करत असल्याने त्यांच्या या कार्याची दखल घेऊन नाशिक स्थित जनकल्याण मराठी पत्रकार संघाच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आल्याचे रफिक सय्यद, सुधीर उमराळकर, मनिषा पवार, अकिल पटेल यांनी सांगितले. पत्रकार बाफना यांच्यावर एकता फाउंडेशन अहिल्यानगर प्रसिद्धीप्रमुख म्हणूनही जबाबदारी असून त्यांची पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्याच्या कोअर कमिटीतील पदाधिकाऱ्यांसह अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



### भाविनिमगाव जिल्हा परिषद शाळेची शिष्यवृत्ती परीक्षेत भरारी

**दहिगाव ने :** येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील ४ थी व ७ वी इयत्तेतील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उज्वल यश संपादन केले असून शाळेतील चौथीतील २७ तर सातवी वर्गातील ३ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेतील चौथीचा ९३ टक्के तर सातव्या १०० टक्के निकाल लागला आहे. मुख्याध्यापक सुभाष शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता चौथी विद्यार्थ्यांना शिक्षिका जयश्री बोरगावकर तर सातवी वर्ग विद्यार्थ्यांना शिक्षक निलेश गोरे यांचे मार्गदर्शन लाभले. गुणवंत विद्यार्थ्यांचे आबासाहेब काळे, संतोष चव्हाण, मिलिंद कुलकर्णी, डॉ. शंकरराव जाधव, बापू शेळके, देविदास देशमुख, सुरेश खरड, माधव काळे, राम मुंगसे, शंकर मरकड अभिनंदन केले.

# वंशवाद नव्हे, ज्ञान व लोकसेवा हाच उमेदवाराचा निकष : ॲड. गवळी

## 'पंचायत राज जेन जी' लोकचळवळीची घोषणा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महाराष्ट्रातील ग्रामीण राजकारणाची पारंपरिक आणि कालबाह्य चौकट बदलून ग्रामविकासाला आधुनिक, पारदर्शक आणि लोकाभिमुख दिशा देण्यासाठी 'पंचायत राज जेन जी' या राज्यव्यापी लोकचळवळीची घोषणा पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने करण्यात आली आहे. या चळवळीची माहिती देताना ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी ग्रामीण नेतृत्वाची नव्याने उभारणी करण्याची गरज अधोरेखित करत, गावांचा कारभार वंशपरंपरा, पैसा किंवा राजकीय वर्चस्वावर नव्हे तर युवा शक्तीच्या ज्ञान, लोकसेवा आणि कार्यक्षमतेच्या आधारावर चालला पाहिजे, असे प्रतिपादन केले.

ॲड. गवळी म्हणाले की, आजच्या काळात गावांच्या विकासासाठी पारंपरिक राजकारण पुरेसे राहिलेले नाही. बदलत्या काळानुसार ग्रामपंचायतींमध्ये आधुनिक विचारांचे, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन असलेले आणि प्रत्यक्ष काम करणारे नेतृत्व निर्माण होणे आवश्यक आहे. याच उद्देशाने 'पंचायत राज जेन जी' ही लोकचळवळ सुरू करण्यात आली असून राज्यभर जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे.

जलसंधारण आणि पर्यावरण संरक्षणाबाबत भान, पावसाचे पाणी अडवून जमिनीत मुरविण्याचे नियोजन, रेन गेन



बॅटरीसारख्या संकल्पना, ठिबक व तुषार सिंचनाचा प्रसार, शाश्वत शेतीचा आराखडा, डिजिटल प्रशासन, भूजल पुनर्भरण, हवामान बदलाच्या परिणामांवर उपाययोजना तसेच सार्वजनिक निधीचा पारदर्शक आणि प्रामाणिक वापर करण्याची क्षमता असलेले नेतृत्वच गावांना विकासाच्या मार्गावर नेऊ शकते, असे त्यांनी सांगितले. ॲड. गवळी यांनी विद्यमान ग्रामीण राजकारणावरही टीका केली. अनेक वर्षांपासून पैसा, जात, धर्म आणि खोट्या आश्वासनांच्या आधारावर ग्रामपंचायतींवर वर्चस्व राखणाऱ्या प्रवृत्तींमुळे गावांचा अपेक्षित विकास झाला नाही. पाणीटंचाई, बेरोजगारी, पर्यावरणाचा ऱ्हास आणि मूलभूत सुविधांचा अभाव यांसारख्या समस्या अधिक गंभीर होत गेल्या.

# तीन पिढ्यांनी जपलेले शिक्षण संस्कार जागतिक पातळीवर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** बाभुळगाव खालसा येथील ज्येष्ठ शिक्षणप्रेमी, माजी शिक्षक ज्ञानदेव रामचंद्र पाबळे उर्फ बाप्पू यांनी तीन पिढ्यांमध्ये रुजविलेल्या शिक्षणसंस्कारांना जागतिक स्तरावर मानाचा तुरा लाभला आहे. त्यांचे नातू तथा डॉ. प्रा. मच्छिंद्र जगन्नाथ पाबळे यांचे सुपुत्र ऋषिकेश मच्छिंद्र पाबळे यांची आशियातील अग्रगण्य अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. त्यांचा अभ्यासक्रम १० ऑगस्ट २०२६ पासून सुरू होणार असून ही संपूर्ण कुटुंबासाठी तसेच अहिल्यानगर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.



ऋषिकेश पाबळे यांनी आपल्या शैक्षणिक वाटचालीत सातत्याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. यापूर्वी मे ते जुलै २०२३ या कालावधीत त्यांनी येथे तीन महिन्यांची यशस्वीरित्या पूर्ण केली होती. संशोधन क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी, नाविन्यपूर्ण दृष्टीकोन आणि उच्च शैक्षणिक गुणवत्ता यांच्या बळावर त्यांची जगातील प्रतिष्ठित विद्यापीठांपैकी एक असलेल्या छढण, डळपसर्रोशि मध्ये पीएच.डी. साठी निवड झाली आहे. ही निवड त्यांच्या परिश्रम, संशोधनातील सातत्य आणि ज्ञानाच्या शोधाची पावती मानली जात आहे.

# राशीनमध्ये लक्ष्मण हाके यांचे स्वागत



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांचे राशीन नगरीत भारतीय जनता पार्टी भटके- विमुक्त प्रदेश सदस्य तात्यासाहेब माने व इतर सहकारी ओबीसी समाजाच्या वतीने वाजत-गाजत, फटाक्यांच्या आतष बाजीसह, फेटा, शाल, हार व पुष्पगुच्छ देऊन भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित नागरिकांनी घोषणाबाजी करत त्यांचे उत्साहात स्वागत केले.

स्वागतानंतर बोलताना ओबीसी नेते.लक्ष्मण हाके साहेब यांनी सामाजिक, राजकीय आणि संविधानिक प्रश्नांवर परखड भूमिका मांडली. त्यांनी म्हटले, आजही इथली व्यवस्था तुम्हाला माणूस म्हणून वागवत नाही. इंग्रज गेले ते बरे झाले त्यांनी पण शोषण केलं पण शिक्षण द्यायला तयार होते ; पण आजचे आमदार, खासदार, वतनदार, जहागिरदार, कारखानदार आणि भांडवलदार यांच्या धोरणांमुळे बहुजन समाजाच्या हक्कांवर गदा येत आहे. पुढे ते म्हणाले, ज्या शिक्षणासाठी आणि नोकऱ्यांसाठी संघर्ष सुरू आहे, त्या सरकारी नोकऱ्याच आता उरलेल्या नाहीत. त्यामुळे संविधान आणि आरक्षणाचे धोरण समजून घेतले पाहिजे. राज्यकर्त्या व्यवस्थेत आपला माणूस गेल्याशिवाय हक्क आणि अधिकारांचे संरक्षण होणार नाही. हाके यांनी उपस्थितांना आवाहन करत सांगितले, लाठ्याकाठ्याचा काळ संपला आहे. आता मतपेटीचा आणि संविधानाचा काळ आहे. यावेळी तात्यासाहेब माने यांच्या कार्यालयात लक्ष्मण हाके यांना सन्मानपूर्वक त्यांच्या सिंहासनावर बसवून गौरव करण्यात आला. या प्रसंगी त्यांनी तात्या माने यांच्या कार्याचे कौतुक केले. त्यावेळी उपस्थित पवन जांभळकर, रवींद्र दामोदर, भैय्या नेवसे, अमर साळवे, किरण जाधव, सुरेश कोंडलकर, राहुल साळवे, राजू ढावरे, कृष्णा राऊत, किशोर साळवे, पिंटू साळवे आवी मासाळ.विनोद जाधव, घोडके यांच्यासह ओबीसी व बहुजन समाजातील अनेक कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

### डॉ. राजपूत व डॉ. चौरसिया यांना डी.ओ. पदवी



**अहिल्यानगर :** अहमदनगर रिहॅब फिजिओथेरपी सेंटरचे फिजिओथेरपिस्ट डॉ. किशनगोपाल राजपूत तसेच सक्षम चौरसिया यांनी कॅनडातील ओंटारिओ प्रांतातून ऑस्टिओपॅथी विषयातील डी. ओ. ही आंतरराष्ट्रीय दर्जाची पदवी संपादन करून आपल्या शैक्षणिक व व्यावसायिक कारकिर्दीत मानाचा टप्पा गाठला आहे. ऑस्टिओपॅथी ही हाडे, सांधे, स्नायू, मणका तसेच शरीराच्या हालचालींशी संबंधित विविध समस्यांवर हातांच्या विशिष्ट तंत्रांच्या साहाय्याने उपचार करणारी आधुनिक व प्रभावी उपचारपद्धती मानली जाते. या उपचारपद्धतीमुळे शरीराची नैसर्गिक कार्यक्षमता वाढविणे, वेदना कमी करणे, हालचालींमध्ये सुधारणा घडवून आणणे आणि रुग्णाला सर्वसमावेशक उपचारांचा लाभ मिळवून देण्यावर भर दिला जातो. फिजिओथेरपी क्षेत्रातील अनुभवासोबत ऑस्टिओपॅथीचे विशेष शिक्षण पूर्ण झाल्यामुळे रुग्णांना अधिक परिणामकारक, वैज्ञानिक आणि अद्ययावत उपचार सेवा उपलब्ध करून देणे शक्य होणार असल्याचा विश्वास डॉ. राजपूत यांनी व्यक्त केला.

# प्रस्थापितांविरुद्ध संघर्ष करून समाज भयमुक्त करण्याचे कार्य डॉ. कुमार सप्तर्षी यांनी केले : पांडुळे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** सर्वसामान्य माणसाच्या हक्कांसाठी प्रस्थापित व्यवस्थेविरोधात संघर्ष करून समाज भयमुक्त करण्याचे कार्य ज्येष्ठ विचारवंत डॉ. कुमार सप्तर्षी यांनी आयुष्यभर केले. देशातील हुकूमशाही प्रवृत्ती असो वा स्थानिक पातळीवरील दडपशाही, त्यांनी त्याविरोधात सातत्याने लढा दिला. युवकांच्या विचारांना दिशा देत त्यांचा आवाज बुलंद करण्याचे कार्यही त्यांनी केले, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते ज्ञानदेव पांडुळे यांनी केले.



अध्यक्षीय भाषणात ज्ञानदेव पांडुळे म्हणाले की, संघर्ष, सत्याग्रह, श्रमप्रतिष्ठा आणि संसदीय लोकशाहीत सक्रिय सहभाग यांवर डॉ. कुमार सप्तर्षी यांचा दृढ विश्वास होता. मालकशाही व अन्यायकारक व्यवस्थेविरोधात लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी त्यांनी अखंड लढा दिला. त्यामुळे ते खऱ्या अर्थाने गांधीवादी विचारांचे नेतृत्व करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून समाजात आदराचे स्थान मिळवू शकले. डॉ. रमेश वाघमारे म्हणाले, डॉ. कुमार सप्तर्षी यांना कोणत्याही चौकटीत बसविणे शक्य नाही. ते केवळ राजकारणी नव्हते, तर समाजमन घडविणारे व्यापक विचारवंत होते.

### प्रधानांचा राजीनामा म्हणजे उशीराने सुचलेले शहाणपण : ॲड. लगड

**अहिल्यानगर :** नीट पेपर फुटीच्या प्रकरणावरून गेल्या एक महिन्यापासून दिल्लीत जंतर-मंतरवर कॉक्रोच जनता पार्टी तर्फे आंदोलन सुरू होते. यामध्ये केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी कॉक्रोज जनता पार्टी कडून करण्यात आलेली होती. याच कारणावरून पर्यावरण कार्यकर्ते व रेमन मॅगसेसे पुरस्कार प्राप्त सोनम वांगचुक हे देखील उपोषणास बसलेले होते मात्र त्यांनी उपोषण सोडले. धर्मेंद्र प्रधानांनी दिलेला राजीनामा हा उशिरा सुचलेले शहाणपण आहे. विशेष म्हणजे कॉक्रोज जनता पार्टीच्या आंदोलनामुळे राजीनामा देणारे धर्मेंद्र प्रधान हे मोदींच्या केंद्र सरकारमधील पहिले मंत्री ठरले असे परखड मत अहिल्यानगरचे ॲड. सुरेश लगड यांनी केले आहे.

### अजय मुथा यांची डायरेक्ट टॅक्स कमिटीवर निवड

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** चार्टर्ड अकाउंटंट्स क्षेत्रातील सर्वोच्च संस्था असणाऱ्या 'द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया', नवी दिल्ली च्या अतिशय महत्त्वाच्या आणि प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या 'डायरेक्ट टॅक्स कमिटी' वर अहिल्या नगर येथील सीए, आयपी अजय मुथा यांची सदस्यपदी निवड झाली आहे. ही समिती प्रामुख्याने आयसीएआयच्यावतीने भारत सरकारचे अर्थ मंत्रालय आणि केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळ यांना इन्कम टॅक्स आणि कर प्रणालीबाबत अत्यंत महत्त्वाचे सल्ले व सूचना देण्याचे कार्य करते. नगरमधील अनेक सामाजिक व व्यावसायिक संस्थांमध्ये ते सक्रिय योगदान देत आहेत. नवी दिल्ली येथील अत्यंत महत्त्वाच्या 'डायरेक्ट टॅक्स कमिटी'वर अहिल्यानगरच्या सुपुत्राची निवड झाल्याबद्दल, बँकेचे संचालक मंडळ, सीए संस्था, व्यावसायिक, मित्रपरिवार आणि संपूर्ण जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची भेट



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** शिक्षण हेच खरे दान या भावनेतून श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील कै. ज्ञानदेव आनंदा कौठाळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कौठाळे परिवाराने श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेतील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना सुमारे २५ हजारांचे शालेय साहित्य वाटप करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. विशेष म्हणजे हा उपक्रम सलग तिसऱ्या वर्षी राबविण्यात आला.

वडिलांच्या निधनानंतर आई शैला कौठाळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्या गुंड, ज्योती गाडगे, सारिका कोकणे आणि अक्षय कौठाळे या भावंडांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत उच्च शिक्षण पूर्ण केले आणि स्वतःच्या कर्तृत्वावर स्थिरावले. त्याच संघर्षाची जाणीव ठेवून आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळा येऊ नये, या उद्देशाने वह्या, दप्तर, गणवेश आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात संदीप वेताळ यांच्या ईशस्तवनाने झाली. प्रास्ताविकात धर्मराज गुंड यांनी उपक्रमामागील सामाजिक उद्देश स्पष्ट केला. यावेळी आनंदराव वेताळ यांनी आठ विद्यार्थिनींना शालेय गणवेश प्रदान केले. कार्यक्रमास नामदेव डुंबरे, संदीप वेताळ, धर्मराज गुंड, विद्या गुंड, अक्षय कौठाळे, किरण कोकणे, सारिका कोकणे, शैला कौठाळे उपस्थित होते. सूत्रसंचालन संदीप घावटे यांनी केले.

# '१७ गावांचा भार एका डॉक्टरांवर'

## कोरडगावच्या मुक्या जनावरांचा वाली कोण?

**शिवाजी बोंद्रे। राष्ट्र सह्याद्री**

**कोरडगाव :** कोरडगाव येथील शासकीय पशुवैद्यकीय दवाखाना असूनही पशुपालकांना अपेक्षित सेवा मिळत नसल्याचे वास्तव समोर आले आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून या दवाखान्याचा अतिरिक्त कार्यभार डॉ. सोनवणे यांच्याकडे असून त्यांच्या ताब्यात आणखी एका दवाखान्याची जबाबदारी आहे. परिणामी एकाच अधिकाऱ्यावर तब्बल १७ गावांतील पशुधनाची जबाबदारी आल्याने मुक्या जनावरांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



(छाया : शिवाजी बोंद्रे)

सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असून जनावरांमध्ये विविध साथीचे व संसर्गजन्य आजार वाढत आहेत. अशा वेळी पशुवैद्यकीय सेवा तातडीने मिळणे गरजेचे असताना अधिकारी दोन दवाखाने, ऑनलाइन कामे, पाथर्डी येथे शासकीय कामांसाठी वारंवार ये-जा आणि बैठका यामध्येच अडकून पडत असल्याचे चित्र आहे. आठवड्यातील सुट्ट्या आणि बैठका वगळता उरलेल्या दिवसांत १७ गावांतील पशुधनाकडे किती लक्ष देता येणार, असा संतप्त सवाल पशुपालक उपस्थित करत आहेत.

वेळेवर शासकीय उपचार न मिळाल्याने पशुपालकांना खासगी डॉक्टरांकडे धाव घ्यावी लागत आहे. मात्र काही खासगी पशुवैद्यक अव्वाच्या सव्वा शुल्क आकारत असल्याने गरीब शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. जनावरांचा जीव वाचवायचा की घर चालवायचे? असा प्रश्न आता पशुपालकांपुढे उभा ठाकला आहे.

कोरडगाव हे परिसरातील प्रमुख गाव असून येथील पशुवैद्यकीय दवाखान्यावर अनेक गावांचा विश्वास आहे. मात्र कायमस्वरूपी अधिकारी नसल्याने शासनाच्या पशुसंवर्धन सेवेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पशुधन हेच अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक आधारस्तंभ असताना त्यांच्याच आरोग्याकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे.

कोरडगावसाठी स्वतंत्र पशुवैद्यकीय अधिकाऱ्याची तातडीने नियुक्ती करावी, अन्यथा पशुपालकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशारा कोरडगावसह परिसरातील पशुपालकांनी दिला आहे. आता पशुसंवर्धन विभाग आणि लोकप्रतिनिधी या गंभीर प्रश्नाची दखल घेणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

मंगळवार दि.२८ जुलै २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## टाकळीभानला पावसामुळे घर पडून एक जखमी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील राजेंद्र बाबुराव पवार यांचे पावसामुळे राहते छप्पर पडले त्या छपरात असलेला राजेंद्र पवार यांचा मुलगा शैलेश राजेंद्र पवार हा छपरा खाली दबल्याने तो जखमी झाला असून त्याला साखर कामगार दवाखान्यात ॲडमिट करण्यात आले आहे, त्याच्या छातीला व पायाला मार लागल्याने त्याची प्रकृती गंभीर आहे.

# राहुरी-शनिशिंगणापूर प्रस्तावित रेल्वेमार्गाविरोधात शेतकरी एकवटले

## कृती समिती स्थापन करण्याचा निर्णय | माजी मंत्री आ. तनपुरे करणार रेल्वे कृती समितीचे नेतृत्व

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : प्रस्तावित राहुरी-शनिशिंगणापूर रेल्वेमार्गामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर एकत्रित भूमिका निश्चित करण्यासाठी दि. २७ जुलै सोमवार रोजी उंबरे येथील साई मंगल कार्यालयात सर्व बाधित शेतकऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. माजी मंत्री तथा विधानपरिषद सदस्य आ. प्राजक्त तनपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीत रेल्वेमार्गाविरोधात व्यापक कृती समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच प्रत्येक गावातून पक्षीय राजकारणापलीकडे जाऊन प्रतिनिधी निवडून कृती समिती स्थापन करण्याची सूचना आ.प्राजक्त तनपुरे यांनी बैठकीत केली.



बैठकीत मार्गदर्शन करताना आ. तनपुरे म्हणाले की, प्रस्तावित रेल्वेमार्गामुळे अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित होणार असून, काहींच्या शेतीचे दोन तुकडे होणार आहेत. या परिसरात कोणतीही मोठी औद्योगिक वसाहत किंवा रोजगारनिर्मितीचा प्रकल्प नसताना केवळ रेल्वेमार्गासाठी सुपीक शेतीचे नुकसान करणे योग्य ठरणार नाही. विकासासाठी आवश्यक आणि लोकहिताचा प्रकल्प असता, तर त्याला विरोध केला नसता; मात्र शेतकऱ्यांचे नुकसान करणारा कोणताही निर्णय स्वीकारला जाणार नाही, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. या विषयावर पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव तसेच केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे तनपुरे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री यांच्या माध्यमातून केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन बाधित शेतकऱ्यांची भूमिका मांडण्यासाठी शिष्टमंडळ नेण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. आवश्यकतेनुसार मुंबई तसेच दिल्ली येथेही तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

प्रत्येक गावातून पक्षीय भेद बाजूला ठेवून सक्षम प्रतिनिधी निवडून कृती समिती स्थापन करण्याचे आवाहन करताना तनपुरे यांनी या समितीत शेतकरी, वकील, पत्रकार, सोशल मीडियाचे जाणकार तसेच विविध क्षेत्रांतील प्रतिनिधींचा समावेश करण्याची सूचना केली. आंदोलन अधिक प्रभावी करण्यासाठी गावागावांत जनजागृती मोहीम राबविणे, माध्यमांच्या माध्यमातून विषय मांडणे आणि सोशल मीडियावर व्यापक जनआंदोलन उभे करण्याचे आवाहनही त्यांनी केले. जमिनी संपादनासाठी कोणताही करार करू नका. प्रकल्पाला कोणत्याही प्रकारचे सहकार्य करू नका. शेतकऱ्यांच्या हक्कांचा हा लढा शेवटपर्यंत लढला जाईल.

> यावेळी रेल्वे प्रकल्प उभारणी साठी आपल्या परिसरात कोणत्याही शेतकऱ्यांनी रेल्वे लाईन उभारण्यासाठी लागणारे सामान ठेवण्यासाठी ठेकेदारास आपल्या जागा शेती कोणत्याही आर्थिक स्वरूपात देऊ नये. तसेच शेतकऱ्यांनी प्रत्येक ठिकाणी माझ्या पाठीशी उभे रहा.ज्यावेळी जेल मध्ये जायची वेळ त्यावेळी सर्वात आधी पुढे प्राजक्त तनपुरे राहिलं. एखादा मोठा उद्योग आला असता तर आम्ही विरोध केला नसता पण शेतकऱ्यांच्या बागायती जमिनी उधवस्त करू यासाठी रेल्वे कृती समितीचे नेतृत्व करणार आहे.
>
> **आ.प्राजक्त तनपुरे, विधानपरिषद सदस्य**

गरज पडल्यास जेलभरो आंदोलन करण्यासही आम्ही तयार आहोत, असे ठाम प्रतिपादन आ. तनपुरे यांनी केले. बैठकीत उपस्थित शेतकरी आणि विविध गावांतील प्रतिनिधींनीही प्रस्तावित रेल्वेमार्ग रद्द करण्यासाठी मुख्यमंत्री, पालकमंत्री, खासदार तसेच सर्व लोकप्रतिनिधींनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, अशी मागणी केली. शेतकऱ्यांच्या हितासाठी व्यापक लोकआंदोलन उभारण्याचा निर्धारही बैठकीत व्यक्त करण्यात आला. बैठकीच्या शेवटी प्रस्तावित रेल्वेमार्गाविरोधात कृती समिती स्थापन करण्याचा अधिकृत निर्णय घेण्यात आला.

प्रत्येक गावातून प्रतिनिधींची नावे तातडीने सादर करण्याचे आवाहन करण्यात आले असून, पुढील आंदोलनाची दिशा कृती समितीच्या माध्यमातून निश्चित केली जाणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. यावेळी बैठकीला बैठकीस तनपुरे कारखान्याचे माजी चेअरमन नामदेव ढोकणे, सुनील अडसूरे,विजय बानकर, राजेंद्र ढोकणे, भागवत देशमुख, डॉ. राजेंद्र बानकर,संचालक डॉ.माऊली दरंदले, धनंजय, वसंत कुसळकर, व्ही. एम. दरंदले, एस.बी.शेटे, शेतकरी संघटनेचे नेते अनिल निमसे, रामेश्वर कुसळकर यांच्यासह विविध गावांतील शेतकरी, ग्रामस्थ व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गोमांस विक्रीप्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी शहरातील इस्माईल नगर परिसरात गोवंशीय जनावरांची बेकायदेशीर कत्तल करून गोमांस विक्री केल्याप्रकरणी राहुरी पोलिसांनी धडक कारवाई करत एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत सुमारे १५० किलो गोमांसासह अन्य साहित्य जप्त करण्यात आले. पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार शनिवारी सकाळी खाटीक गल्ली येथे छापा टाकण्यात आला. यावेळी निसार जब्बार शेख यांच्या घरासमोर विक्रीसाठी ठेवलेले सुमारे १५० किलो गोमांस (किंमत ३० हजार), वजनकाटा व मांस कापण्यासाठी वापरण्यात येणारा लाकडी ठोकळा जप्त करण्यात आला. तपासात हे गोमांस अवेज रज्जाक शेख याने विक्रीसाठी दिल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम तसेच भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

## उशाजवळ बांधलेल्या कुत्र्यावर बिबट्याचा हल्ला

### नागरिकांमध्ये भीती

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील दाभाडे वस्तीवर मध्यरात्री घडलेल्या एका थरारक घटनेने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

घराच्या पोर्चमध्ये उशाजवळ खांबाला बांधलेल्या छोट्या इंग्लिश जातीच्या कुत्र्याच्या पिल्लावर बिबट्याने हल्ला करून त्याचा फडशा पाडल्याने ग्रामस्थांमध्ये खळबळ उडाली आहे. ही घटना भर लोकवस्तीत घडल्याने नागरिकांमध्ये मोठी दहशत पसरली आहे.

विलास दाभाडे हे घराच्या पोर्चमध्ये झोपलेले असताना मध्यरात्री बिबट्या घरासमोर आला.



पोर्चमध्ये एका खांबाला छोटा कुत्रा आणि त्याची आई बांधलेली होती. बिबट्याला पाहताच मोठ्या कुत्रीने साखळी तोडून प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला.

मात्र बिबट्याने छोट्या पिल्लाच्या मानेवर झडप घातली. आपल्या पिल्लाला वाचविण्यासाठी आई कुत्रीने बिबट्यावर वारंवार धाव घेतली, तरीही पिल्लाचा जीव वाचू शकला नाही. कुत्र्यांच्या भुंकण्याचा आवाज ऐकून विलास दाभाडे व त्यांच्या पत्नी जागे झाले. समोर बिबट्या पाहून ते क्षणभर हादरले.

त्यांनी आरडाओरडा करताच बिबट्या पिल्लाला टाकून पसार झाला. मात्र मानेवर गंभीर जखम झाल्याने पिल्लाचा मृत्यू झाला.

या घटनेनंतर दाभाडे वस्ती तसेच टाकळीभान परिसरातील नागरिक भयभीत झाले असून रात्रीच्या वेळी घराबाहेर झोपण्यासही धास्तावत आहेत. लोकवस्तीत बिबट्याचा वावर वाढल्याने वनविभागाने तातडीने पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी विलास दाभाडे यांच्यासह ग्रामस्थांनी केली आहे.

## अल्पवयीन मुलीची आत्महत्या

### व्हॉट्सप चॅटिंगमुळे मानसिक तणावाचा वडिलांचा आरोप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील महाडूक सेंटर परिसरातील मुसळवाडी येथे १५ वर्षीय अल्पवयीन मुलीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना सोमवारी (दि. २७) उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून आत्महत्येमागील नेमके कारण शोधण्यासाठी राहुरी पोलीस सर्व बाजूंनी तपास करत आहेत.

मृत मुलीचे नाव साक्षी किशोर बर्डे (वय १५, रा. मुसळवाडी) असे आहे. रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास तिने राहत्या घरात साडीच्या साहाय्याने गळफास घेतल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

सोमवारी सकाळी हा प्रकार उघडकीस आल्यानंतर कुटुंबीयांनी तातडीने राहुरी पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच पोलीस हवालदार जयदीप बडे व शेषराव कुटे यांनी घटनास्थळी धाव घेतली. रुग्णवाहिका चालक रविंद्र देवगिरे यांच्या मदतीने



साक्षीला राहुरी येथील रुग्णालयात नेण्यात आले.

मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर तिला मृत घोषित केले. दरम्यान, मृत मुलीच्या वडिलांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत मानोरी येथील एका मुस्लिम तरुणासोबत व्हॉट्सपवर सातत्याने होत असलेल्या चॅटिंगमुळे मुलगी मानसिक तणावाखाली होती आणि त्यातून तिने आत्महत्या केल्याचा आरोप केला आहे. पोलिसांनी या तक्रारीची दखल घेत संबंधित बाबींची चौकशी सुरू केली आहे.

या प्रकरणात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा किंवा इतर कोणते कारण आहे का, याचा तपास सुरू असून मोबाईलमधील माहिती, डिजिटल पुरावे आणि इतर परिस्थितीजन्य बाबींची पडताळणी केली जात आहे. पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## साकूर-पिंपळगाव देपा रस्त्यावर भीषण अपघात

### रणखांब फाट्याजवळ दोघांचा दुर्दैवी मृत्यू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**घारगाव** : साकूर ते पिंपळगाव देपा रस्त्यावरील खंडेरायवाडी शिवारात, रणखांब फाट्याजवळ झालेल्या भीषण रस्ते अपघातात दोन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. सोमवारी (२७ जुलै) दुपारी १२:५० वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. संजय पुना जाधव (वय ४७, रा. माणूसवाडी, रणखांब, ता. संगमनेर) आणि समसउद्दीन बशीर मोमीन (वय ५७, रा. पिंपळगाव देपा, ता. संगमनेर) अशी अपघातात प्राण गमावलेल्या दोघांची नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, दोघेही आपल्या दुचाकीवरून जात असताना रणखांब फाट्याजवळ त्यांच्या दुचाकीला अपघात झाला.

या अपघातात दोघेही गंभीर जखमी झाले होते. घटनेनंतर त्यांना तातडीने घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच घारगाव पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने घटनास्थळी व रुग्णालयात धाव घेतली.

ग्रामीण रुग्णालय घुलेवाडी यांच्याकडून प्राप्त मेमोनुसार घारगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची (अ.मृ. रजि. क्र. ५७/२०२६, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १९४) नोंद करण्यात आली आहे. घटनेची नोंद पोलीस अंमलदार डी. एस. मरभळ यांनी केली असून, पोलीस उपनिरीक्षक पी. ए. महाले हे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. या अपघातामुळे रणखांब व पिंपळगाव देपा परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## श्रीरामपुरात चोरीचा प्रयत्न !

### बेलापूर परिसरातील वाघ यांच्या बंगल्यावर पाच चोरट्यांचा दरोड्याचा डाव सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर येथील गायकवाड वस्ती शिवारात धाडसी चोरीचा प्रयत्न उघडकीस आला आहेत. रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास येथील रहिवासी असलेल्या वाघ यांच्या बंगल्यात दरोडा टाकण्याच्या उद्देशाने आलेल्या पाच चोरट्यांचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे. या घटनेमुळे संपूर्ण श्रीरामपूर तालुक्यात आणि विशेषतः बेलापूर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार रविवारी मध्यरात्री, गायकवाड वस्ती शिवारात वाघ कुटुंबीयांचा बंगला आहेत. त्याठिकाणी ५ सज्जड चोरट्यानी दरोडा टाकण्याचा प्रयत्न केला. चोरट्याना तेथे काही मुद्देमाल



हाती लागलेला नाही. विशेष म्हणजे ते चोरीच्या उद्देशाने आले होते का? त्यामागे काही राजकीय हेतू आहे का? या गोष्टीचा तपास करणे गरजेचे आहेत.चोरट्यानी चेहऱ्यावर काहीतरी गोण्या आणि कपडे बांधून आले होते. रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास पाच संशयित चोरांनी वाघ यांच्या बंगल्याच्या परिसरात अत्यंत संशयास्पद हालचाली केल्या. विशेष म्हणजे,आपली ओळख लपवण्यासाठी आणि पोलिसांच्या किंवा सीसीटीव्हीच्या नजरेपासून वाचण्यासाठी या पाचही जणांनी आपल्या चेहऱ्यावर गोणी आणि कपडे घट्ट बांधले होते.

ते दरोड्याच्या किंवा मोठ्या चोरीच्या उद्देशानेच आले असल्याचे त्यांच्या हालचालींवरून स्पष्ट होते. मात्र, बंगल्याच्या आवारात आणि बाहेर लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात या सर्व चोरांच्या हालचाली कैद झाल्या. मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या या प्रकारामुळे परिसरात एकच लाट उसळली. ग्रामीण भागात आणि शेतशिवारात असलेल्या वस्त्यांवर चोऱ्यांचे प्रमाण वाढल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी सतर्कता बाळगली असून, सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या हाती लागल्याची शक्यता आहे. या फुटेजच्या आधारे पोलीस आता त्या पाचही चोरांचा कसून शोध घेत आहेत. अशा घटनांमुळे रात्रीच्या वेळी पोलिसांची गस्त वाढवावी, अशी मागणी बेलापूर परिसरातील ग्रामस्थांकडून केली जात आहे.

## दुचाकी चोरणारा अट्टल चोरटा जेरबंद

### पाच मोटारसायकली हस्तगत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : नगर शहर व परिसरातून मोटार सायकल चोरी करणारा अट्टल चोरट्याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने नगर शहरात मोठ्या सीताफिने जेरबंद केले. किशोर जयसिंग पठारे (रा. पिंपळगाव माळवी, ता. नगर ) असे अटक केलेल्या चोरट्याचे नाव असून त्याच्याकडून पाच मोटारसायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत सावेडी उपनगरातील एकविरा चौक येथून मोटरसायकल चोरी करून फरार झालेला आरोपीचा स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस शोध घेत होते. सदरच्या आरोपी किशोर पठारे यांनी हा गुन्हा केला असून तो मोटरसायकलवरून रामवाडी कडून तारकपूर बस स्टॅन्ड कडे येणार असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाला गुप्त बातमीदारामार्फत समजली. त्याआधारे पोलीस पथकाने रामवाडी ते तारकपूर बस स्टॅन्ड रोडवर सापळा रचला. त्यावेळी एक संशयित इसम मोटरसायकलवर येताना दिसला. त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले असता त्याने त्याचे नाव किशोर जयसिंग पठारे असे सांगितले. त्याच्याकडे अधिक चौकशी करता त्याने मोटरसायकली चोरीची कबुली दिली. त्याच्याकडून १ लाख ५५ हजार रुपये किमतीच्या पाच मोटरसायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत. सदरची कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार अरविंद भिंगारदिवे, योगेश भिंगारदिवे, पूरकान शेख, दीपक घाटकर, भीमराज खडसे, प्रमोद जाधव, प्रशांत राठोड यांच्या पथकाने केली. सदरचा आरोपी हा सराईत असून त्याच्याकडून इतरही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलीस सूत्रांकडून वर्तवण्यात येत आहे.

## रांगोळीतून साकारली विठोबा रुखमाई



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : मारवाडी गल्ली भागात राहणाऱ्या श्रावणी हरीष लालसरे या विद्यार्थिनीने रांगोळीच्या माध्यमातून विठ्ठल रुख्मिणीचे अतिशय आकर्षक चित्र काढले आहे. आषाढी एकादशीच्या पर्वावर मागील काही वर्षांपासून ती सातत्याने हा उपक्रम राबवत आहे. हे चित्र साकारताना रांगोळीच्या विविध रंगांचा कलात्मक वापर करण्यत आल्याचे तिने सांगितले. या कामात तिला नारायणी सोमण लालसरे व कृष्णाई या दोघीनी मदत केली आहे. माजी नगराध्यक्षा शिल्पा परदेशी व धोंडीरामसिंह राजपूत यांनी भेट देऊन श्रावणीची प्रशंसा केली.